शनिवार । ४ एप्रिल १९८१ । एक रुपया

# माणूस

## वीस वर्षांत मराठी कथा दुबळी झाली..

**बारामतीचे साहित्य शिबिर**

पृष्ठ...१२

बारामतीच्या चर्चासत्रात
सर्वांत महत्त्वाचे विवेचन झाले
ते दलित कथेसंबंधी.
त्याचे श्रेय प्रा. वसंत दावतरांना
दिले पाहिजे.

## स. न. वि. वि.

¤ सोबत 'सहावी कथा' 'ब्रेन-ड्रेनच-पण वेगळ्या तऱ्हेचा' ही पाठवत आहे.

पुढच्या शनिवारी 'आता मराठी नेत्यावर सिनेमा निघणार' ही कथा पाठवीन. गांधींवर निघतो आहेच. नेहरूंवर रशिया काढावयाचा विचार करत आहे. तेव्हा मराठी नेत्यावर सिनेमा निघालाच पाहिजे. हा नेता कोण ते ओळखालच.

७ मार्चच्या अंकातील 'किसान-मेळावा खास वार्तालेख' फार आवडला. कारणे दोन-आम्ही दिल्लीला बरीच वर्षे राहिलो असल्याने डॉ. दाभोळकरांनी टिपलेली दिल्ली अगदी डोळ्यासमोर उभी राहिली व जाणवली. दुसरे कारण त्यांनी शरद जोशींबद्दलच्या व्यक्त केलेल्या अभिमानाशी मी सहमत आहे. एका माणसाने सगळ्या देशाचे व काही अंशी जगाचे ध्यान आपल्याकडे ओढून घेतल्याची उदाहरणे अगदी थोडी आहेत व शरद जोशी हे त्यातले ठळक उदाहरण.

२० मार्च, १९८१ — **फिरोझ रानडे**, मुंबई

¤ आपला २८-२-८१ चा अंक वाचला. त्यात श्री. जकातदार यांनी लिहिलेला लेख 'पोखरत चाललेली हिंदी चित्रपट सृष्टी' सर्व साधारण माहितीच्या दृष्टीने उपयुक्त वाटला. त्यातील केलेले विश्लेषण पाहून, लेखकाचे या झगमगत्या हिंदी चित्रपट सृष्टीच्या अंतरंगाचा फार खोलवर अभ्यास केल्याचे जाणवते. नेहमीच्या सिने-साप्ताहिकांतील माहितीपेक्षा हा लेख जरा वेगळा वाटला.

१२ मार्च, १९८१ — **संजीव कुलकर्णी,** डोंबिवली.

पुणे वार्ता

# विद्यापीठ पदवीदान नवं वर्ष, नवं स्वरूप

गुरुवार, ता. २८ मार्च. पुणे विद्यापीठाचे आवार, मुख्य इमारतीसमोर रंगीबेरंगी फुलांचे ताटवे फुललेले. त्याच्या पार्श्वभूमीवर फोटो काढणारे तरुण-तरुणी. इमारतीच्या प्रवेशद्वाराशी विद्यापीठ अधिकाऱ्यांची धावपळ. कॅमेरे खांद्याला लटकावून छायाचित्रकाराची लगबग.

आज विद्यापीठाचा ६४ वा वार्षिक पदवीदान समारंभ साजरा होणार होता; पण या दिवसाचं एवढंच महत्त्व नव्हतं. यंदा प्रथमच पदवीदान समारंभाची पद्धत आमूलाग्र बदलली होती. झुलीसारखे गाउन आणि डोक्यावरच्या वैशिष्ट्यपूर्ण टोप्या (हूड) आता अदृश्य झाल्या होत्या. त्यांची जागा जरीच्या उपरण्यांनी घेतली होती. विद्यापीठाचे कुलगुरु, कुलसचिव, कार्यकारिणी – विधिसभा सदस्य आणि समारंभात पदव्या घेणारे पदवीधर या सगळ्यांच्या खांद्यावर झुलणाऱ्या उपरण्यांमुळं सारं वातावरण खास 'भारतीय' झालं होतं. निमंत्रितांना गुलाबाची टपोरी फुलंही देण्यात येत होती.

केंद्रीय शिक्षणमंत्री शंकरराव चव्हाण समारंभाचे मुख्य पाहुणे होते. दुपारी ठीक साडेचार वाजता समारंभ सुरू झाला. यंदापासून समारंभाचं सर्व संचालनही मराठी भाषेत झालं. यापूर्वी ते मुख्यत्वे इंग्रजी व संस्कृत भाषेतूनच व्हायचं. त्यामुळे नेमकं काय चाललंय ते फारसं कुणालाच कळत नसे.

सुरवातीच्या सरस्वतीस्तवनानंतर या वर्षीच तयार करण्यात आलेलं 'पुणे विद्यापीठ गीत' सादर झालं. प्रसिद्ध कवी मंगेश पाडगावकर यांनी हे गीत रचलं. गीताचे शब्द होते, 'पुण्यमयी दे आम्हा अक्षर वरदान, ज्ञान बनो कर्मशील, कर्म ज्ञानवान.' प्रयोगशील संगीतामध्ये सध्या अग्रस्थानी असलेले संगीतकार भास्कर चंदावरकर यांनी गीताला संगीत दिलं होतं. समूहस्वरात सादर झालेल्या या गीतानं श्रोत्यांना ठेका धरायला लावला. फक्त हार्मोनियमच्या साथीवर म्हटलेलं हे गीत समारंभ संपल्यावरही अनेकांच्या कानात रुंजी घालत होतं.

विद्यापीठाचे कुलसचिव सुभाषचंद्र भोसले यांनी कुलगुरूंना समारंभ सुरू करण्याची विनंती केल्यावर कुलगुरूंनी सूत्रं हाती घेतली. प्रथम निरनिराळ्या विद्याशाखांच्या पदवीधरांना पदव्या प्रदान केल्याचं घोषित करण्यात आलं. त्यानंतर पीएच. डी. मिळवलेल्या चाळीसजणांना कुलगुरूंच्या हस्ते समारंभपूर्वक पदव्या देण्यात आल्या. विद्यापीठ परीक्षांमध्ये उत्कृष्ट गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना कुलगुरूंनी सुवर्णपदकही दिली

आपल्या भाषणात या समारंभाच्या बदललेल्या पद्धतीचा कुलगुरूंनी आवर्जून उल्लेख केला व यामागील मुख्य प्रेरणा ख्यातनाम साहित्यिक पु. ल. देशपांडे यांची असल्याचंही सांगितलं. त्यानंतर 'विद्यापीठ गीता'चे रचनाकार मंगेश पाडगावकर व संगीतकार भास्कर चंदावरकर यांचाही शाल-श्रीफल देऊन कुलगुरूंनी सत्कार केला.

आता प्रमुख पाहुण्यांचं दीक्षांत भाषण सुरू झालं. शंकररावांचं आतापर्यंतचं कर्तृत्व लक्षात घेता ते काही तरी भरीव मुद्दे मांडतील अशी अपेक्षा होती, पण त्यांनी एकदम निराशा केली. जुनेच मुद्दे व समारंभाला न शोभणारी लांबी यामुळे भाषण अगदी रटाळ झालं.

पाहुण्यांचं भाषण झाल्यावर राष्ट्रगीत होऊन समारंभ संपला.

यंदाच्या या समारंभाबद्दल सर्वांनाच उत्सुकता होती, आकर्षणही होतं. गेली काही वर्षं हा समारंभ कंटाळवाणा होत चालला होता, त्यामुळे त्यात सहभागी होणाऱ्या ज्येष्ठ विद्यापीठ अधिकाऱ्यांपासून पदवी घेणाऱ्या विद्यार्थ्यांपर्यंत कोणालाच त्यात फारसा रस उरला नव्हता या बदललेल्या पद्धतीनं हे चित्र पालटवलं समारंभाला गर्दी चांगली झाली होती आणि बहुतेकजण शेवटपर्यंत थांबले होते. हा उत्साह पुढे कितपत टिकतो ते पाहायचं; पण पहिला प्रयोग तरी चांगलाच यशस्वी ठरला, यात शंका नाही.

काही महिन्यांपूर्वी 'पुणे वार्ता' मध्येच लिहिताना पदवीदान समारंभ विद्यापीठात करण्याची पद्धत बदलून कॉलेजपातळीवर माजी विद्यार्थ्यांचे मेळावे आयोजित करून त्या ठिकाणी हा समारंभ 'गेट टुगेदर'च्या स्वरूपात करावा असं मी म्हटलं होतं; पण त्यामुळे 'विद्यापीठ पदवीदाना'चं गांभीर्य आणि अर्थपूर्णता नष्ट होईल (जी फारशी राहिलीच नव्हती) असं काहीजणांचं मत पडलं. यंदाच्या या संपूर्णतः वेगळ्या स्वरूपातल्या पदवीदान समारंभानेही ती कितपत साधली असेल, याबद्दल शंका आहे; पण किमान यामुळे समारंभाची आकर्षकता तरी बऱ्यापैकी वाढली, हे मान्य करायलाच हवं. (जरी ती बहुतांशी बाह्य पोषाखाच्याच पातळीवर असली तरी.)

एकूण, 'पदवीदान समारंभ' ही संकल्पनाच आपण पाश्चात्याकडून उचलली आहे. यंदा तिच्या बाह्य स्वरूपात काही बदल झाले; आता अंतर्गत बदल साधता येतील का आणि ते कसे साधता येतील, यावर बुद्धिवंतांनी आपलं लक्ष केंद्रित करावं, असं या समारंभाच्या निमित्तानं सुचवावंसं वाटते.

–प्रतिनिधी


साप्ताहिक माणूस

वर्ष : विसावे

अंक : चव्वेचाळिसावा

४ एप्रिल १९८१

किंमत : एक रुपया

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

# टिळक–परिसंवाद

पुणे विद्यापीठाच्या राज्यशास्त्र व लोकप्रशासन विभागामध्ये १९५६ साली लो. टिळकाच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने भारत सरकार व त्या वेळचे मुबई सरकार याच्या संयुक्त विद्यमाने लो. टिळक विद्यासन निर्माण झाले. या विद्यासनात एक प्राध्यापक, एक व्याख्याता व एक संशोधनसहाय्यक अशा तीन जागा निर्माण करण्यात आल्या. या विद्यासन स्थापनेला २५ वर्षे पूर्ण झाली. त्या निमित्ताने या विभागातर्फे मार्च १९, २० आणि २१ तारखेला 'लो. टिळकांचा राजकीय विचार व नेतृत्व ' या विषयावर तीन दिवसाचा अखिल भारतीय पातळीवरील एक परिसंवाद डॉ. ना. र. इनामदार यांच्या संचालनाखाली विद्यापीठात आयोजित करण्यात आला होता. लो. टिळकाच्या राजकीय तत्वज्ञानाचा आणि त्यांच्या राजकीय नेतृत्वाचा गाढा व्यासंग असलेल्या अखिल भारतीय पातळीवरील अनेक नामवंत राजकीय विचारवंतानी या परिसंवादात भाग घेतला होता. सर्वश्री डॉ. व्ही. पी. वर्मा, शेषाद्री, बि के. केळकर, य. दि. फडके, श्रीमती नलिनी पंडित, सत्यरंजन साठे, ए. बी. शहा, ए. व्ही सोवनी या नामवंत विचारंताचा यात समावेश होता. परिसंवादात एकूण पन्नास व्यक्तीनी भाग घेतला होता आणि लो. टिळकांच्या राजकीय जीवनाचा विविध अंगांनी अभ्यासपूर्वक चिकित्सा करणारे एकूण सत्तावीस शोध–निबंध या परिसंवादात वाचले गेले. शोध–निबंधानंतर होणारी मनमोकळी चर्चाही तितकीच उद्बोधक होती.

परिसंवादाचे उद्घाटन टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरु श्री. एस् व्ही. कोगेकर यांच्या हस्ते झाले. आपल्या उद्घाटनपर भाषणात त्यानी इंग्रजी अंमलात भारतात प्रबोधनास सुरुवात कशी झाली हे सागितले आणि पाश्चात्य देशांप्रमाणे येथील प्रबोधन म्हणजे प्राचीन परंपरा व अभिजात विचार, साहित्य याचे पुनरुज्जीवन नव्हते,तर पाश्चिमात्य संस्कृतीच्या सान्निध्यात आल्याने नव्या मानवी मूल्यांचा परिचय भारतीयांना होत होता आणि म्हणून येथील प्रबोधन हे पश्चिमी विचाराभिमुख होते, त्या काळातील विचारवंताचा अभ्यास करताना या गोष्टीचे सतत भान ठेवले पाहिजे, असे सागून प्रो. कोगेकर म्हणाले की, या संदर्भात टिळकाचा अधिक वस्तुनिष्ठ विचार करण्याची खरी हीच वेळ आहे.

शोध–निबंधाचे वाचन आणि त्यानतर त्याविषयीची चर्चा असे या परिसंवादाचे स्वरूप होते. टिळकांचा राष्ट्रवाद, नेतृत्व, धार्मिक व नैतिक विचार, सामाजिक सुधारणाबाबतची भूमिका, त्याची ऐतिहासिक मीमांसा, तत्कालीन आतरराष्ट्रीय घटनाविषयीचा त्यांचा दृष्टिकोन, नोकरशाहीकडे पहाण्याचा त्यांचा दृष्टिकोन इ. अनेक बाजूचा चिकित्सक अभ्यास करणारे शोधनिबंध एकूण आठ सत्रात वाचले गेले.

सर्वश्री डॉ. व्ही. पी. वर्मा, प्रा. सत्यरंजन साठे, डॉ. ना. र. इनामदार, प्रा. नलिनी पंडित, प्रा. य. दि फडके, डॉ सु. न. तवले, आर्. श्रीनिवासन प्रा ए, बी. शहा प्रभृतीचे निबंध विशेष उल्लेखनीय होते. लो. टिळकाच्या राष्ट्रवादाची मूळं प्राचीन भारतीय परंपरा व तत्कालीन राजकीय विचारप्रवाहांचा जो त्याच्यावर प्रभाव पडला होता त्यात सापडतात असे सांगून डॉ. व्ही. पी. वर्मा म्हणाले, ' टिळकांचा राष्ट्रवाद हा पुनरुज्जीवनवादी असला तरी अरविंदाच्या बंगाली राष्ट्रवादापेक्षा तो खूपच वेगळा आणि अधिक इहवादी होता. स्वामी दयानंदांनी वास्तविक स्वराज्याची कल्पना आधीच सागितली होती; पण टिळकाच्या स्वराज्याच्या कल्पनेत केवळ वेदकालीन स्वराज्याचे पुनरुज्जीवन नव्हतेतर त्यांच्या स्वराज्यात शिवकालीन संदर्भ होता. एका बाजूला स्वातंत्र्याचा अत्यंत तत्त्वगर्भ अर्थ सांगत असतानाच मॅथिनी, बर्क, मिल आणि शेवटी विल्सन याच्या विचारांचा संस्कार घेत ' टिळकाची स्वराज्याची कल्पना विकसित झाली,' असे डॉ. वर्मांनी सागितले.

टिळकाची कायदेविषयक कल्पना ही प्रामुख्याने तत्कालीन इंग्लंडमधील कायदेविषयक विचारांचा वारसा सांगणारीच होती, असे विचार प्राचार्य सत्यरंजन साठे यानी व्यक्त केले. सामान्यत इंग्रजी साम्राज्य भारतात आल्याच्या वेळी इंग्लंडमधील कायदेविषयक विचारांवर जेरेमी बेंथॅमच्या उपमुक्ततावादी तत्वज्ञानाचा प्रभाव अधिक होता. मुक्त अर्थव्यवस्थेचा तो काळ असल्याने सार्वजनिक क्षेत्रात राज्याचा कमीत कमी हस्तक्षेप व्हावा, असा विचार त्या काळात प्रभावी होता. सहाजिक सामाजिक परिवर्तनाचे एक साधन म्हणून कायद्यांकडे पहाण्याचा इंग्रजांनी कधीच दृष्टिकोन ठेवला नाही. टिळकांनीसुद्धा याच दृष्टिकोनाची जोपासना केली.

लो. टिळकांच्या इंग्रजी साम्राज्याशी असलेल्या सघर्षाचे एक परिमाण म्हणजे त्याचा नोकरशाहीशी अहर्निश चाललेला झगडा होय आणि या झगड्यातूनच त्यांचा नोकरशाहीविषयीचा दृष्टिकोन स्पष्ट झालेला आहे, असे मत डॉ. ना. र. इनामदार यांनी मांडले. ' टिळकाची राजकीय विचारप्रणाली व नोकरशाही ' या विषयावरील निबंध सादर करीत असताना डॉ. इनामदार म्हणाले, " राष्ट्रवाद, लोकशाही व ' वेल्फेअरिझम ' या तीन सूत्रांच्या संदर्भातच टिळकांचा नोकरशाहीविषयीचा दृष्टिकोन विकसित झाला होता. ' निःपक्षपातीपणे स्वतंत्र निर्णय घेणारी एक व्यवस्था–' हा नोकरशाहीचा वेबरप्रणीत अर्थ, वसाहतींच्या प्रशासनात गैरलागू ठरतो. वसाहतीचे प्रशासन हे साम्राज्यवादी सत्ताच्या राजकीय स्वार्थासाठी राबवले जाते हे सोदाहरण दाखवून देणारी टिळक ही आद्य व्यक्ती होती,' असे त्यांनी सांगितले. प्रशासन हे अधिकाधिक विकेंद्रित, लोकाभिमुख असावे असे टिळकानी ठासून सांगितले आहे,असेही डॉ. इनामदार म्हणाले.

'लो. टिळक व तत्कालिन जागतिक घटना ' ह्या संदर्भात डॉ. सु. न. तवले यांनी टिळकाचा आंतरराष्ट्रीय दृष्टिकोन स्पष्ट केला. भारताच्या स्वातंत्र्याच्या संदर्भात आणि ' ईस्ट–वेस्ट डायकॉटॉमी 'च्या संदर्भात टिळकांचा आतरराष्ट्रीय दृष्टिकोन विकसित झाला होता, असे सांगून तवले म्हणाले, ' रशियाबद्दलची इंग्रजाना वाटणारी भीती टिळकानाही भासत होती आणि म्हणून इंग्रजांच्या ' फॉरवर्ड पॉलिसी 'चा निषेध करताना टिळकांनी तो केवळ भारतीय अर्थव्यवस्थेतील पडणाऱ्या ताणाच्या संदर्भातच केला आहे जपान चीनवर कब्जा प्रस्था-

पित करतो यातून टिळकांना जपानच्या साम्राज्यवादाची चाहूलक शी लागत नाही, याविषयी आश्चर्य व्यक्त करून ते म्हणाले की, केवळ आधुनिकीकरणाने व तांत्रिक विकासाने राष्ट्राचा अभ्युदय होतो, हे जपानच्या चीनवरील विजयाच्या संदर्भात स्पष्ट करून सांगताना टिळकांनी भारतीय पारतंत्र्याची मीमांसा तात्रिक अध पाताच्या संदर्भात करून भारतीय पारतंत्र्याचा प्रश्न फारच वरवरच्या पातळीवर सोडवला आहे.' हे सर्व मानूनही टिळकाना 'आशियाई अस्मितेचे' भान होते, असेही डॉ. तवले यांनी प्रतिपादन केले.

अशा प्रकारे टिळकांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विविध पैलूंचा सर्व बाजूंनी या परिसंवादात विचार झाला. चर्चासत्राच्या शेवटी होणारी चर्चा अधिक कसदार होती. सर्वश्री शेषाद्री, प्रा. राम बापट, प्रा. य. दि. फडके, प्रा. सरदेसाई, प्रा. नलिनी पंडित प्रभृतींचा चर्चेतील सहभाग लक्षणीय होता.

या परिसंवादाची सांगता तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या भाषणाने झाली. टिळकांनी आपले राजकीय विचार ज्या भाषेत सांगितले त्या मराठीतूनच मी माझे भाषण करणार आहे, असे सांगून शास्त्रीजी म्हणाले, 'संतांनी सामान्य जनतेस अध्यात्मिक वाणी दिली, तर सामान्यांना राजकीय वाणी देणारा टिळक हा पहिला राजकीय नेता होता!'–तर्कतीर्थ. टिळकांच्या राष्ट्रवादाचा पाया हा संकुचित नसून तो प्रामुख्याने मानवतावादी होता. टिळकांचे राजकीय चिंतनाचे अधिष्ठान हे आध्यात्मिक असले तरी त्याचा अध्यात्मवाद इहवादाला सामावून घेणारा होता, असे सांगून तर्कतीर्थ म्हणाले की, एका व्यापक मानवतावादी दृष्टिकोनातूच टिळकांनी आपले विचार सांगितले आहेत आणि म्हणूनच ते आजही शाश्वत आहेत.

तर्कतीर्थांच्या या मराठी भाषणाचा अनुवाद डॉ. ना. र. इनामदारांनी इंग्रजीतून संक्षिप्तपणे केला. डॉ ताकवले यांच्या अध्यक्षीय भाषणानंतर प्रा. य. दि. फडक्यांनी सर्वांचे आभार मानले व या कार्यक्रमाची सांगता झाली. –प्रा. यशवंत सुमंत

---

# संप : बजाज टेंपो लि. : कामगारांची बाजू

---

जून ७९–बजाज ऑटो गोळीबार–कामगारांकडून निर्मितिक्षमतेची अवाजवी अपेक्षा ( ३० जून ७९ 'माणूस' मुखपृष्ठ ) आता संप बजाज टेम्पोची!

व्यवस्थापनाने २५% उत्पादनवाढ मागितली. कामगार संघटनेने ती धुडकावून ३०० ते ३५० रु. पगारवाढ मागितली. अद्यापपर्यंत वातावरण बऱ्यापैकी शांत! नेहमीप्रमाणे गेट–मीटिंग्ज, मोर्चे चालू आहेत.

कार्यकारी संचालक श्री. एच्. के. फिरोदिया विश्रांतीसाठी परगावी जाणार अशी बातमी. कंपनीचे को–ऑपरेटिव्ह स्टोअर्स बंद! त्यातच दमदाटी व दगडफेकीचा फिरोदियांनी केलेला निषेध! असे संप राष्ट्रविरोधी अशी केलेली घोषणा...वातावरण तापू लागलेय! आजपर्यंत शात–उद्याची हमी कोण घेणार? याला जबाबदार फिरोदिया की कामगार संघटना? राहून राहून 'ऑटोचे' प्रसंग डोळ्यासमोर येतात. ऑटोत राहुलकुमार बजाज, तर टेंपोत फिरोदिया. तेव्हा रूपमय चतर्जी, तर आता 'सीटू'चे मानकर! ऑटोतून 'सायकर' 'व्हिक्टिमाईझ' झाले; 'पिल्ले'चे काय होणार? ऑटोत गोळीबार... ३ ठार... बजाज टेम्पो... एक प्रश्नचिन्ह!

तसे पुणेकराना फिरोदिया माहीत आहेत ते टेम्पोच्या बरोबरीने महाविद्यालयीन सांस्कृतिक पारितोषिकाच्या 'फिरोदिया' करंडकामुळे. खरं तर बजाज ऑटो–टेम्पो या तशा 'बजाज' परिवारातल्या! भाडवलपुरवठा म्हणजे बजाज व तांत्रिक–व्यावसायिक बाबी म्हणजे फिरोदिया असा घट्ट साधा होता; पण काळ फिरली अन् ४० टक्के भाग–भाडवल फिरोदियाचे झाले व बजाज टेम्पो लि. ला (F) चिकटला.

८१ सालापर्यंत बजाज टेंपोतील जुन्या कराराची मुदत होती. आधीपासूनच वाटाघाटी चालू होत्या सी आय. टी. यु. च्या पत्रकानुसार ८० मेमध्ये आलेल्या तडजोडीनुसार कामगार संघटना मालक–त्रयस्थ– अशा त्रिपक्षसमितीच्या मार्फत उत्पादनाचे प्रमाण निश्चित करण्याचे मान्य झाले होते. उत्पादनाचे प्रमाण हे कामगारांच्या वेतनवाढीच्या तडजोडीनुसार ठरवण्याचे एकमताने ठरले होते; परंतु या समितीचा निर्णय येण्यापूर्वीच २५% उत्पादनवाढीचा निर्णय व्यवस्थापनाने लादला व तो मान्य केल्याशिवाय वेतनवाढीचा विचार करण्याचे नाकारले. ताबडतोबीने टेम्पोअंतर्गत सी. आय. टी. यु. ची ३०० ते ३५० रु. वेतनवाढीची मागणी पुढे आली व कायदेशीर सोपस्कारानंतर १५ मार्चपासून बेमुदत संप सुरू झाला! दोषारोप, पत्रकापत्रकी, वृत्तपरिषदा झाल्या व दोन्ही आघाड्यावर मोर्चे सज्ज झाले.

सी. आय. टी. यु. (सीटू) ही मार्क्सवादी कम्यु. पक्षाशी 'अॅफिलिअेटेड' अशी कामगार संघटना! कॉ. मानकर, कॉ. बेरी (पूर्वाश्रमीचे नक्षलवादी) कॉ. चव्हाण व टेम्पोतील पिल्ले यांच्या नेतृत्वाखाली बेमुदत संप सुरू असून दररोज गाणी, सभा, मोर्चे, इतर संघटनांचे पाठिंबे, सर्वत्र लागलेले बावटे यानी वातावरण लाल झालेले आहे!

उत्पादनवाढीस नकार देऊन बेमुदत संप सुरू केल्याबरोबर पत्रकारासमोर हा संप राष्ट्रविरोधी असल्याचा फिरोदियांनी दावा केला. उत्पादनात खंड पाडणारी संपामागील प्रेरणा ही राष्ट्रविरोधी व लोकशाहीविरोधी असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले व यामुळे वातावरण हेतुपुरस्सर अस्वस्थ केल्याचा आरोप केला.

आता खरोखरीच उत्पादनवाढ म्हणजेच राष्ट्रहित व उत्पादनात खड म्हणजे राष्ट्रद्रोह, या घाईघाईच्या व सुटसुटीत समीकरणाकडे येण्यापूर्वी काही मुद्दे विचारात घेणे जरुरीचे आहे. उत्पादनवाढीबद्दल व्यवस्थापन व कामगार सघटना या दोघाचे निकष विरुद्ध व वेगळे

असणे स्वाभाविक आहे. वास्तवाचे भान राखण्यासाठी टेम्पोच्या ताळेबदात शिरणे जास्त महत्वाचे आहे.

७८ सप्ट.अखेराच्या ताळेबदानुसार निव्वळ नफा+घसारा(Depriciation)+रिझर्व हो रक्कम सुमारे ५ कोटी, ४८ लाख, ८७ हजार ९०५ रु. इतकी होती. तर ७९ सप्टेंबरच्या अखेरीस ती सुमारे ८ कोटी, ३८ लाख, २१ हजार ९१२ रु. होते. यातोल नफाच जवळजवळ ३ ते ४ कोटी होतो. रिझर्व अँड सरप्लस एका वर्षात १ कोटी, ८२ लाख, ९१ हजार ६५७ रु. नी वाढला, तर निव्वळ नफा जवळजवळ दुपटीने वाढला. विक्री ३० कोटो ७० लाखावरून ४० कोटी ७० लाखावर गेली

एकदरीत विक्री, निव्वळ नफा, रिझर्व या सर्व बाबीत लक्षणीय वाढ झाली आहे. एकूण खर्चात जी वाढ झाली आहे त्यापैकी बहुताश वाढ कच्चा माल, व्यवस्थापकीय व विक्रीचा खर्च यातच झाली असून कामगारावरील पगाराच्या आकड्यात तुलनात्मकदृष्टचा किरकोळदखील वाढ नाही.

## सीटूची भूमिका

या सर्व बाबतीत 'सीटू' ची भूमिका स्पष्ट करताना कॉ. प्रभाकर मानकर असे म्हणतात की, राहणीमान व ग्राहक–निर्देशाकात प्रचड वाढ होऊनही, पगारवाढ नाकारून उत्पादनक्षमता वाढविण्याचा आग्रह धरणे, हा 'भाडवलदारी अट्टाग्रह' आहे. उत्पादन, विक्री व नफ्यात इतकी लक्षणीय वाढ झाली याचा अर्थ उत्पादनक्षमता वाढली व एकूण उत्पादनही वाढले. एका वर्षात २–३ कोटीची वाढ होऊनही अधिकाकाधिक उत्पादनवाढ मागणे किंवा कामगाराची उत्पादकता कमी आहे असा दावा करणे ही विसंगती आहे, असे त्याचे म्हणणे. बजाज टेपोची निर्मिती ही 'डिझेल मशीन' सबधित असून एकूण जागतिक पेट्रोल अरिष्टाची पार्श्वभूमीही विचारात घ्यावी लागेल.

इटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशनच्या निकषानुसार एकूण येणारा खर्च व होणारी विक्री, यातून सुटणारा निव्वळ नफा या प्रमाणातच बोनस दिला जातो. कॉ. मानकराच्या निवेदनानुसार गेली कित्येक वर्षे सातत्याने टेम्पोच्या कामगाराना कमाल कायदेशीर बोनस हा २० टक्के मिळतो. या सर्व गोष्टीवरून टम्पोच्या कामगाराने पुरेशी उत्पादनक्षमता दाखवली असून उत्पादनवाढ करून दिली आहे. याउलट जागतिक स्पर्धेच्या आहारी जाऊन, अधिक नफ्याची आशा धरून, त्याचा पुरेसा मोबदला न देता उत्पादनवाढ लादणे हेच अधिक अमानवी व राष्ट्रहितविरोधी असल्याचा ते दावा करतात. त्याच्या भूमिकेतील एक महत्त्वाचा भाग म्हणजे 'टेम्पो' ही जर्मन कोलॅबोरेशनची कपनी असून २ ते ३ सचालक जर्मन आहेत. नफ्यातील बराचसा वाटा व परदेशी चलन फिरोदिया किंवा भारत सरकारऐवजी जर्मनाकडेच जातो.

अशा रीतीने येथोल कामगाराना पगारवाढ न देता उत्पादनवाढीचा बोजा लादून परकीय भाडवलदाराकडे नफ्याचा हिस्सा वळवणे हेच मुळात राष्ट्रहितविरोधी आहे.

मार्क्स पक्षातर्गत तथा 'सिटू'ची सैद्धातिक भूमिका अशी आहे की, खऱ्याखुऱ्या मार्क्सवादी 'जनसघटनेने' अधिक उत्पादनाचा बोजा लादून घऊन पगारवाढोची मागणी मान्य करू नये. उत्पादकतेचा व पगारवाढीचा अगर बोनसचा असा नफ्याच्या हावेपोटी सबध लावणे गैर आहे आणि अशा स्वरूपाची उत्पादनवाढ स्वीकारून पगारवाढ एखाद्या ठिकाणी मान्य केली तर त्या युनिटचे सभासदत्व रद्द करण्यात येते. स्वतःला 'कामगारवादी,' 'खरे कम्युनिस्ट' म्हणवून घणाऱ्या अन्य अनेक संघटना उत्पादनवाढीचे असे सरसकट करार करतात. मुळातच या उत्पादनाच्या चक्रात कामगाराची पिळवणूक होत असते. (वरकड मूल्याचा सिद्धांत) त्यातून अधिक उत्पादनवाढीसाठी व त्यामुळे पगारवाढीसाठी त्यांना कामाला जुपून भार व बोजा वाढवणे हेच अमानुष व राष्ट्रविरोधी आहे.

अर्थात केवळ या तात्त्विक व पायाभूत सिद्धांताशी अंगमेहनतीची कुस्ती न करता कॉ. मानकरानी 'सीटू'ची टेम्पो सदर्भातली मागणी पुढे केली व स्पष्ट केले की, केवळ उत्पादनवाढीस आमचा सरसकट विरोध नाही; पण कायम कामगारांवर कामाचा अधिक बोजा लादून त्यांना पिळण्यापेक्षा तात्पुरत्या लावून घेतलेल्या कामगाराना कायम करा, अधिक कामगारभरती करा आणि मग उत्पादनवाढ करा.

'सिटू'च्या भूमिकेनुसार उत्पादनवाढीचा सबंध हा रोजगाराशी लावला गेला पाहिजे. भाडवलदाराची ही नेहमीची हाकाटी असते की, उत्पादनवाढ हवी; पण अधिक भरती करून अगर तात्पुरते आहेत त्याना कायम करण्याऐवजी, आहेत त्याच्यावर ते बोजा लादू पाहतात. रोजगाराभिमुख उत्पादनवाढ ही भांडवलदारास महागातच पडते. कॉ. मानकर याचा तर आरोप आहे की, स्वत.च्या वैयक्तिक फायद्याच्या लालसेपोटी उत्पादनवाढ व क्षमता याचा राष्ट्रवादाशी संबंध जोडणारे भाडवलदार अधिक रोजगार शक्य असतानाही निर्माण करत नाहीत. कारण त्यामुळे त्याचा नफा कमी होतो व म्हणून तेच खऱ्या अर्थाने राष्ट्रद्रोही आहेत. आज बजाज टेम्पोत सुमारे १२०० तात्पुरते कामगार आहेत व त्याना कायम करावे व उत्पादनवाढ घडवावी अशी त्याची मागणी आहे.

आज बजाज टेम्पोत सुमारे २७०० पूर्णवेळ कामगार आहेत. १. अधिक कामाचा बोजा नको. २. पगारवाढ. ३. हगामीना कायम करून उत्पादनवाढ या मागण्यावरून बेमुदत सप सुरू आहे. कर्मचारी, सुपरवायझर्स याच्याही मागण्या कामगारानी माडल्या आहेत. त्याच्यापैकी काहीना व्यवस्थापनाने फोडले आहे वातावरण हळूहळू पेटणार ! आसपासच्या परिसरात या व अशाच कारणावरून कुरबुरी होत असून लढ्याच्या व सपाच्या सलामी झडत आहेत. काही ठिकाणी तर सुरुवातही झालेली आहे. साधारण हेच वातावरण, याच स्वरूपाच्या मागण्या व ताकद आणि परिस्थितीनुसार कमी-अधिक तीव्रता !

खरे तर 'टेम्पो'–उत्पादनवाढ–संप–हे त्रिकूट या ना त्या स्वरूपात अनेक वेळा पुढे आले आहे. अनेक समज व त्याबरोबरीने गैरसमजही झाले आहेत. भडका उडण्यापूर्वीच या प्रश्नाची तड लागली तर बरे. अन्यथा पुन्हा एकदा संप–गोळीबार आणि 'माणूस'मध्ये तसाच एक वृत्तात !

**काही ठळक तपशील**

१. सपावर असणाऱ्या १२०० कामगारापैकी ७५ टक्के कामगारांचे पगार दरमहा ६२०–७५० रु. २५ टक्के कामगाराचे पगार दरमहा ६५०–८५० रु.

२. हगामी कामगार सुमारे १२०० व त्याना प्रत्येकी मिळणारा इजिनिअरिंग किमान वेतनानुसार पगार, दरमहा ३५०–४०० रु.

३. एकूण ३९ अधिकारी–दरमहा प्रत्येकी सुमारे ३००० रु. किंवा जास्त.

**कमाल मर्यादा**

एच. के. फिरोदिया १,३३,०७१ रु. वार्षिक.

**किमान मर्यादा**

एन. एस. व्ही. राव ३६,५२४ रु. वार्षिक.

(सप्टें. ७९ अखेर)

—आर. डी.

मुक्ताफळे

# बायकोचे आत्मचरित्र

आमच्या बायकोने आत्मचरित्र लिहिले असेल अशी शंकादेखील कधी आली नव्हती. जवळच्या वाचनालयातून ती नियमाने मासिके बदलून आणते आणि प्रसंगी जागरण करून वाचत बसते हे आम्ही पाहिलेले होते, परंतु या वाचनाचा परिणाम इतका तीव्र होईल याची आम्हाला कल्पना नव्हती; परंतु 'पंचशील प्रकाशना'चे उघडे पत्रच पोस्टमनने हाती दिले.

पत्र असे होते–

स. न. वि. वि.

आपले पत्र पोचले. 'मंगळसूत्राचे मणी अर्थात आमच्या संसाराची साठवण' या आपल्या आत्मचरित्राचे प्रकाशन करण्यास आम्हाला आनंदच राहील. तरी आपण आपले हस्तलिखित घेऊन कार्यालयीन वेळात आम्हास भेटावे.

कळावे,

आपला

प्रा. प्रेमकुमार गोरजगुडे

पंचशीला प्रकाशनाकरता

पत्र आम्हीच बायकोला दिले असते तर, आतापर्यंत गुप्त ठेवलेली गोष्ट आपल्याला कळली हे समजून तिचा विरस झाला असता म्हणून आम्ही पत्र दारातच टाकून ठेवले व पुढे काय काय घडते याची वाट पाहू लागलो. बायकोने आत्मचरित्र लिहिणे हे नवऱ्याला धोकादायक असते हे आम्ही मराठीतील काही आत्मचरित्रे वाचून समजून होतो.

दोन-तीन दिवस काहीच घडले नाही आणि मग एका शनिवारी सायंकाळी, बाहेर गेलेली बायको घरी परतली तो संतापाने थरथरतच. हातातली पिशवी टेबलावर भिरकावून खुर्चीत बसत ती पुटपुटली–

'हलकट मेले!'

पिशवी वाकडीतिकडी फेकली गेल्याने, त्यातले 'मंगळसूत्राचे मणी' खाली ओघळले. हस्तलिखित हातात घेत आम्ही विचारले–

'काय झालं काय?'

बायकोने मग आम्हाला घडलेली सविस्तर हकिगत सांगितली; पण तिला संताप आवरत नव्हता आणि तिने ज्या पद्धतीने ती सांगितली तशीच सांगणे आम्हाला केवळ अशक्य आहे. झाले काय ते थोडक्यात सांगतो.

पंचशील प्रकाशन – बुकसेलर्स अँन्ड पब्लिशर्स यांच्या दुकानी बायको गेली. दुकानातल्या माणसाने 'शेट मागच्या बाजूस आहेत' असे सांगून काउंटरची फळी उचलून तिला दुकानाच्या मागील बाजूस जाण्यास सांगितले. मागे जिना होता. जिना चढून पहिल्या मजल्यावर जाताच प्रथम तिला प्रा. गोरजगुडे भेटले. बायकोला प्रा. गोरजगुडे यांनी शेटजीकडे नेली. शेटजीची खोली लागूनच होती.

तिथे एका भल्या मोठ्या मेजामागे कोचाची खुर्ची होती, त्यावर शेटजी बसलेले होते. मागे भिंतीवर शेटजीच्या वडिलांचा भला मोठा भडक रंगातला फोटो होता. त्या फोटोखाली 'शुभ लाभ' अशी तांबडी पाटी होती. मेजासमोर चार गोल खुर्च्या होत्या. शेजारी एक आडवा कोच होता.

बायको आत गेली तेव्हा कोचावर आधीच एक बाई बसलेल्या होत्या. अंगाने स्थूल, चेहरा चांगला गरगरीत अशी ती ठसठशीत बाई होती. प्रा. गोरजगुड्यांनी माझ्या बायकोला त्या स्त्रीशेजारी कोचावर बसण्यास सांगितले.

शेटजीच्या कानाशी बोलून प्रा. गोरजगुडे त्या जाडजूड बाईंना म्हणाले–

'चला मिसेस रानडे, तुमच्या पुस्तकाचे प्रथम ठरवू!'

मिसेस रानडे उठल्या. शेटजीसमोरच्या एका खुर्चीत त्या पदर सावरत बसल्या. शेटजींनी विचारलं–

'तुमच्या पुस्तक कसला आहे?'

मिसेस रानडे म्हणाल्या – 'स्वत.च आपले आत्मचरित्र लिहिणार होते; पण ते काही झाले नाही. म्हणून मग मीच या आठवणी लिहिल्या–'

प्रा. गोरजगुडे म्हणाले–

'म्हणजे हे सर्व तुम्ही स्वत.च लिहिलंय ना?'

'हो, हे मी लिहिलंय – स्वतः लिहिलेलं नाही–'

'मी लिहिलंय म्हणता – स्वतः लिहिलेले नाही म्हणता!' प्राध्यापक गडबडून गेले होते.

'प्रोफेसर, ते नवऱ्याचा नाव नाही घेते. तेनला ते 'स्वतः' म्हणते.'

शेटजीना समजले ते प्राध्यापक गोरजगुंडे यांना समजले नव्हते! मग शेटजीच विचारू लागले–

'तुमच्या पुस्तकामधी काय आहे हे थोडक्यामधी सांगा बाई तुम्ही.'

'स्वत ची हकिगत ताई सासूबाईंच्या तोंडून ऐकली तशीच दिली आहे. ताई सासूबाई रागावल्या म्हणजे स्वत.च्या लहानपणच्या गोष्टी सांगत. बाकी सगळ्या आठवणी माझ्याच आहेत...'

बाईंनी मग मामंजींचा रागीट स्वभाव, स्वत.चे त्यांच्यावरचे प्रेम, झालेला सासुरवास, स्वत ची हायकोर्टजज्ज म्हणून झालेली नेमणूक, वगैरे सांगायला सुरवात केली.

शेटजी कंटाळले. ते प्राध्यापक गोरजगुड्यांना म्हणाले–

'तुमी यानला आपल्याला बुकमधी काय पाहिजे ते सांगून टाका प्रोफेसर.'

बाई सांगायच्या थांबल्या, प्राध्यापक म्हणाले,

'तुमच्या यजमानांची पहिली बायको वारली तेव्हा ते ३१ वर्षांचे. लग्न झाले तेव्हा तुम्ही दहा वर्षांच्या. म्हणजे तुम्ही १७–१८ वर्षांच्या झालात तेव्हा यजमान चाळीशीला आले होते. अशा नवऱ्याविषयी तुमच्या मनात नक्की असमाधान असायला हवे. त्याबद्दल तुम्ही काही लिहिलंय का?'

बाई रागाने लाल होत चाललेल्या पाहून पुन: शेटजी मध्ये पडले. म्हणाले–

'प्रोफेसर, ते आपल्या दुसऱ्या पब्लिकेशनमधल्या तेनला जरा वाचून दाखवा ना!'

प्राध्यापक गोरजगुडे यांनी जवळच्या रॅकमधले एक पुस्तक काढले आणि पाने चाळीत ते मिसेस रानड्यांना म्हणाले–

"आता या बाई पहा कशा स्पष्ट लिहितात. 'धोतर नेसलेला, पोट सुटलेला एक गृहस्थ तिथे उभा होता. त्याला मुंडावळ्या बांधलेल्या होत्या. यावरून माझ्या लक्षात

आले की हाच माझा नवरा होणार आहे."

प्राध्यापकांनी आणखी काही पाने उलटली आणि ते वाचू लागले–

'कसला तो किळसवाणा स्पर्श ! हा स्पर्श का माझी काया फुलवणार ? शृंगार नाही की काही नाही. एकदम त्याची मला ..'

मिसेस रानड्यांनी कानावर हात ठेवले तेव्हा प्राध्यापक गोरजगुडे वाचायचे थांबले; मग त्यांनी बाईंना विचारले–

'तुमच्या यजमानाच्या आयुष्यात इतर काही स्त्रिया आल्या असणार किंवा तुमच्या आयुष्यात इतर काही पुरुष आले असणार. तुमच्या पुस्तकात हे सर्व यायला हवे.'

बाई ताडकन उठून उभ्या राहिल्या. संतापाने थरथरत म्हणाल्या–

'देवमाणसाविषयी असं बोलवतं कसं तुम्हाला ? ज्या देदीप्यमान तेजोमय सौभाग्य सूर्याच्या प्रकाशात मी मोठ्या भूषणाने आणि खऱ्या आनंदाने २७ वर्षे वागत होते त्या सूर्याच्या प्रकाशाचा...'

'पुस्तक प्रकाशित व्हायला काही उपयोग नाही बाई'

प्रा. गोरजगुडे यांनी विनोद केला आणि ते स्वतःच शेटजीकडे पाहून हसले.

शेटजी गंभीर होते. मराठीच्या प्राध्यापकाचा हा उठवळ विनोद त्यांना आवडला नव्हता. ते म्हणाले–

'बाई तुमचा पुस्तक आम्ही नाही छापू शकते. ते खपेल नाय ! पुस्तक खपायचा तर हल्ली हॉट पुस्तक लागते. पुस्तक हॉट असला की हिट होते.'

त्या बाई बाहेर पडण्यापूर्वीच आमची बायको मंगळसूत्राचे मणी पिशवीत कोंबून दुकानाबाहेर पडली. पाठोपाठ रमाबाईसाहेब रानडे 'आमच्या आयुष्यातील आठवणी' घेऊन बाहेर पडल्या असाव्या.

हकीगत सांगून बायको म्हणाली–

'आम्ही सामान्य बायका. असामान्य अनुभव आणायचे कुठून ? माझ्या आयुष्यात कुणी पुरुष आलेले नाहीत. तुमच्या आयुष्यात कुणी दुसऱ्या बायका आल्या असल्या तरी त्याचा पत्ता तुम्हीच पोस्टात असल्याने मला लागलेला नाही ! अहो, त्या मिसेस रानड्याचा नवरा मी म्हणते, हायकोर्ट जज्ज तरी होता. तरी त्यांचं पुस्तक छापेना तो शेटजी ! तुम्ही तर काय सगळा जन्म पोस्टात काढून आता चार महिन्यांनी रिटायर होणार...'

'मंगळसूत्राचे मणी अर्थात आमच्या संसाराची साठवण' हे आत्मचरित्र आता प्रसिद्ध होत नाही हे नक्की झाल्यावर, निदान बायकोने आपल्याविषयी काय लिहिले आहे, या उत्सुकतेपोटी दुसऱ्या दिवशी आम्ही हस्तलिखित शोधू लागलो बायको म्हणाली–

'ते घातले सकाळीच बंबात. आता निदान बंब तापलाय तो आंघोळ तरी करून घ्या !'

—ग्यानबा

# आसाम

## तोडगा लादण्याचे प्रयत्न

वा. दा. रानडे

आसाममध्ये अन्वरा तैमूर याच्या नेतृत्वाखालील इंदिरा काँग्रेसच्या मंत्रिमंडळाविरुद्ध विधानसभेत मांडण्यात आलेला अविश्वासाचा ठराव सरकारच्या बाजूने दहा मते अधिक पडून फेटाळला गेला. सरकार तरले पण ते विरोधी पक्षामधील फुटीमुळेच तरले. त्याच्यामागे निर्विवाद बहुमत नाही. एकूण १२१ सभासदाच्या सभागृहात इंदिरा काँग्रेस पक्षाचे फक्त ४४ सभासद आहेत. मंत्रिमंडळातील एक मंत्री श्री. नागवंशी यानी राजिनामा दिला होता. त्यांचा आठ सभासदांचा गट आहे. हा गट फुटला असता तर सरकार वाचणे कठीण होते; पण केंद्रीय नेत्यानी त्यांच्याशी बोलणी केली, त्याना काही आश्वासने दिली आणि नागवंशी यानी आपला राजिनामा मागे घेतला. नागवंशी चहाकामगारांचे नेते आहेत. चहाकामगारांना मंत्रिमंडळात अधिक प्रतिनिधित्व मिळावे ही त्यांची मागणी मान्य करण्यात आली.

असे असले तरी मंत्रिमंडळ मुख्यतः तरले ते डाव्या गटानी स्वीकारलेल्या भूमिकेमुळे; डाव्या गटाचे तेवीस आमदार विधानसभेत आहेत, त्यानी अविश्वास ठरावाला पाठिंबा दिला असता तर तैमूर मंत्रिमंडळ निश्चित वाचत नव्हते; पण हे तेवीस सभासद गैरहजर राहिले. सरकारचा पराभव करण्यास बाकीच्या विरोधी पक्षाचे बळ त्यामुळे कमी पडले.

डाव्या पक्षानी अशी भूमिका का स्वीकारली ? आसाममधील डाव्या पक्षावर बंगालमधील डाव्या पक्षाचा प्रभाव आहे. परकीयाच्या प्रश्नावर आसाममध्ये चालू असलेल्या आंदोलनाला या पक्षाचा विरोध आहे. आसाममधील बंगालीचे हितसंबंध त्यामुळे धोक्यात येतील असे त्यांना वाटते. तैमूर सरकार गडगडले असते तर आसाममध्ये राष्ट्रपतीची राजवट आली असती. तेही त्याना नको होते. ही भूमिका स्वीकारण्यामागे केवळ एवढेच उद्देश होते की आणखी काही कारणे होती ? आम्ही आसाममधील तुमचे सरकार पाडत नाही; बंगालमधील आमचे सरकार तुम्ही पाडू नका असा काही अलिखित करार तर इंदिरा काँग्रेस आणि मार्क्सवादी याच्यात होऊ पहात नाही ना ? आसामच्या दृष्टीने तरी असा करार इंदिरा काँग्रेसच्या फायद्याचाच आहे. तैमूर मंत्रिमंडळाला तर त्यामुळे स्थैर्य येईलच; पण परकीयांच्या प्रश्नावर आपल्याला अनुकूल असा तोडगा डाव्या गटांच्या पाठिंब्याने आसामवर लादता येईल असे इंदिरा काँग्रेसच्या नेत्याना वाटते. आसाममध्ये पुनः लष्कराच्या हाती मोठ्या प्रमाणावर अधिकार देण्यात आले आहेत. राज्याच्या बहुतेक सर्व भागात अशांत परिस्थिती जाहीर करण्यात आली आहे.

या पार्श्वभूमीवर वाटाघाटीनी आसाममधील परकीयांचा प्रश्न सुटण्याची आशा आता दुरावल्यासारखी वाटते. अखिल आसाम विद्यार्थी संघटना आणि अखिल आसाम जनपरिषद यांना आपल्या मागण्यांसाठी पुनः तीव्र आंदोलन उभारावे लागेल. आंदोलनाला बहुसंख्य आसामी जनतेचा पाठिंबा आहे, हे पूर्वीच स्पष्ट झालेले आहे; पण सरकारची सध्याची भूमिका लक्षात घेता त्यांच्या मागण्या सरकार मान्य करण्याची शक्यता दिसत नाही. डावे गट, मुस्लिम व इतर अल्पसंख्यांक आदिवासी यांचा पाठिंबा मिळवून त्यांना मान्य होईल असा तोडगा

अंमलात आणावयाचा, विरोध झाल्यास लष्करी बळाचा वापर करून तो मोडून काढावयाचा या दृष्टीने सरकारच्या हालचाली चालू असल्याचे दिसते.

आसाममध्ये परप्रांतीय व परदेशी (मुख्यतः पूर्वीच्या पूर्वपाकिस्तानातून किंवा नंतर बांगलादेशामधून आलेले) मुक्तपणे आले. तेथील सरकारी नोकऱ्या, उद्योगधंदे यात मोक्याच्या जागा त्यांनी मिळविल्या. आपल्या प्रांतात आपणच उपेक्षित असा अनुभव आसामींना येऊ लागला आणि त्यातून त्यांचे आंदोलन उभे राहिले.

परकीयांच्या प्रश्नावर काँग्रेसनेत्यांनी प्रथमपासून योग्य भूमिका घेतली असती तर हा प्रश्नच निर्माण झाला नसता; पण राज्याची सत्ता आपल्या हाती टिकविण्यासाठी पूर्वीच्या पूर्वपाकिस्तानमधून आणि नंतर बांगलादेशमधून काँग्रेसनेत्यांनी मुस्लिमांना अनिर्बंध प्रवेश दिला, एवढेच नव्हे तर त्यांना मतदानाचा हक्कही दिला. मतदारयाद्यात त्यांची नावे घातली. १९५१ नंतर आसाममध्ये आलेल्या परकीयांची नावे मतदारयाद्यांतून काढून टाकावी ही आंदोलकांची प्रमुख मागणी आहे.

आसाम आंदोलन राष्ट्रीय एकात्मतेविरुद्ध आहे. आंदोलकांना आसामची फाळणी करायची आहे असा विपर्यस्त प्रचार इंदिरा काँग्रेसच्या नेत्यांनी आंदोलनाविरुद्ध केला. आंदोलकांना आसामची फाळणी करायची नाही किंवा देशापासून आसाम वेगळा काढावयाचा नाही; पण त्यांच्याविरुद्ध तसा हेतुपुरस्सर प्रचार केला जात आहे. आसामी विरुद्ध बिगरआसामी असे उघड दोन तट आसाममध्ये पडले आहेत हे मान्य करायलाच हवे.

मग यातून मार्ग काय ? काही निश्चित तत्त्वाच्या आधारेच हा प्रश्न सोडवायला हवा. मुख्य तत्त्व राष्ट्रीय एकात्मतेचे. भारताच्या नागरिकांना भारताच्या कोणत्याही भागात स्थायिक होण्याचा, उद्योगधंदे करण्याचा हक्क असला पाहिजे. काश्मीरमध्ये परप्रांतीयांनी जमीनजुमला विकत घेण्यावर, उद्योगधंदे करण्यावर निर्बंध आहेत. मिझोराममध्येही अशाच प्रकारचे निर्बंध आहेत. हे निर्बंध कितपत योग्य याचा विचार केवळ तात्त्विक भूमिकेवरून करून चालणार नाही. त्यांना हे स्वातंत्र्य व हक्क असले पाहिजेत हे तत्त्वतः मान्य; पण त्याचबरोबर हे हक्क अनिर्बंध नाहीत, सापेक्ष आहेत हे लक्षात घेतले पाहिजे. तेथील मूळ रहिवाशांच्या हक्कांना, हितसंबंधांना त्यामुळे बाध येत नाही ना याकडेही लक्ष दिले पाहिजे. राष्ट्रीय एकात्मता आणि प्रादेशिकता यांचा योग्य समन्वय साधायला हवा. विशिष्ट मर्यादित प्रादेशिकत्वाची जपणूक हवीच. प्रत्येक प्रदेशाची विशिष्ट भाषा व संस्कृती शेकडो वर्षांच्या इतिहासाने बनली आहे. तिची जपणूक व संवर्धन करायलाच हवे; पण त्याचबरोबर इतर प्रदेशांच्या भाषा व संस्कृतींच्या विकासास त्यामुळे बाध येत नाही, त्यावर आक्रमण केले जात नाही याबद्दलही जपायला हवे. हे भान ठेवले न गेल्यामुळेच आसामची आजची समस्या निर्माण झाली आहे. प्रत्येक प्रदेशाची मूळ भाषा व संस्कृती, तेथील मूळच्या लोकांचे हक्क व हितसंबंध यांना बाध येऊ न देता भारताच्या इतर भागांतील लोकांनी तेथे स्थायिक होण्यास, उद्योगधंदे उभारण्यास हरकत नाही हे तत्त्व अनुसरायला हवे. प्रत्येक प्रदेशात तेथील जे मूळचे लोक आहेत त्यांच्याच हाती तेथील कारभार असला पाहिजे, याच तत्त्वाची दुसरी बाजू म्हणजे प्रत्येक राज्यात किंवा प्रदेशात इतर प्रदेशातील जे लोक स्थायिक होतील त्यांच्यावर अवाजवी निर्बंध घातले जाऊ नयेत. मूळ लोकांच्या हितसंबंधांना बाध येऊ न देता हे लोक तेथे स्थायिक होत असतील, उद्योगव्यवसाय करीत असतील, आपल्या भाषेचे–संस्कृतीचे संवर्धन करीत असतील तर त्यांना तसे करण्यास पूर्ण मोकळीक असली पाहिजे.

ही तात्त्विक भूमिका सर्व संबंधित घटकांनी एकदा मान्य केल्यावर मग या प्रश्नावर तोड निघणे कठीण जाणार नाही; पण व्यापक तात्त्विक भूमिकेपेक्षा सत्तेच्या राजकारणात आणि त्यातून निर्माण होणाऱ्या संघर्षात हा प्रश्न अडकून पडला आहे. आसाम-प्रश्न सोडविण्यापेक्षा त्या राज्याची सत्ता आपल्या हाती टिकविणे इंदिरा काँग्रेसला अधिक महत्त्वाचे वाटते आणि सत्ता टिकविण्यासाठी जे गट आपल्याला पाठिंबा देतात त्यांना मान्य होईल असाच तोडगा आसाममधील परकीयांचे प्रश्नावर इंदिरा काँग्रेस काढणार व चळवळ दडपून टाकून तो अंमलात आणण्याचा प्रयत्न करणार ! पण हे सोपे नाही; आपल्याला न्याय मिळेपर्यंत आंदोलन चालू ठेवण्याचा आसाम आंदोलकांचाही ठाम निर्धार आहे. प्रश्न लौकर सुटण्याची शक्यता दिसत नाही. □


तिसरी आवृत्ती



सांगत्ये ऐका

रसिकांची, समीक्षकांची,
सर्वसामान्य वाचकांची
मान्यता लाभलेले
हंसा वाडकर यांचे
अनोखे आत्मचरित्र
किंमत : बारा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

अवतीभवती । शरद कृष्णन्

# □ विश्वासार्हता गमावलेले माध्यम

आणीबाणीच्या कालखंडामध्ये आकाशवाणीची विश्वासार्हता सपुष्टात आली होती. काय परिस्थिती आहे याची लोकाना पुरेशा प्रमाणात कल्पना नसली तरी आकाशवाणी जे सागते आहे ते काही खरे नाही, हे लोक समजून चुकले होते. आकाशवाणी हे सत्ताधारी पक्षाच्या अंकित असलेले आणि शासनाला अनुकूल अशाच बातम्या प्रसिद्ध करणारे एक माध्यम बनले होते. आजही परिस्थिती फारशी वेगळी नाही. जनता राजवटीच्या काळात माहिती आणि नभोवाणी मत्रालयाची सूत्र साभाळणारे माजीमत्री एल. के. अडवानी यानी या सदर्भात 'इलस्ट्रेटेड विकली'मध्ये लिहिलेला लेख पुरेसा बोलका आहे. आकाशवाणीवरून प्रसृत झालेल्या बातम्याची छाननी करून लालजीनी आकाशवाणी व दूरदर्शन याचा 'विश्वासार्हता गमावलेले माध्यम' असा उल्लेख आहे.

आकाशवाणीच्या केंद्रसचालकाची एक बैठक नवी दिल्ली येथे बोलावण्यात आली होती. त्या बैठकीत बोलताना पतप्रधान इदिराजी म्हणाल्या, 'आकाशवाणीच्या विश्वासार्हतेचा प्रश्न निघाला की, हा काय प्रकार आहे मला समजू शकत नाही. वृत्तपत्रे सरसहा खोट्या बातम्या प्रस्तुत करत आहेत. अनेक बाबतीमधील त्याचे अंदाज साफ कोसळले आहेत. विश्वासार्हता आहेच कोठे ? याउलट आकाशवाणीवरून आम्ही वस्तुनिष्ठ बातम्या देण्याचा प्रयत्न करतो.'

पतप्रधान असे काहीही म्हणत असल्या तरी जनता राजवटीमध्ये आकाशवाणी आणि दूरदर्शनबद्दल जी एक आत्मीयता जनतेमध्ये निर्माण झाली होती ती झपाट्याने कमी होत आहे. या माध्यमानी आणीबाणीमध्ये गमावली होती तशी पद्धतीने विश्वासार्हता गमावली नसेल, तथापि, सध्या आकाशवाणी व दूरदर्शन हे सपूर्णपणे शासकीय दृष्टिकोन प्रक्षेपित करणारे माध्यम झाले आहे. लालजीनी रात्री ९ च्या बातम्या प्रमाणभूत मानून एक महिन्याची आकडेवारी काढली आहे. जानेवारी ८१ मधील या आकडेवारीचा तपशील देताना ते म्हणतात, १४ दिवसापैकी ९ दिवस या बातम्यामध्ये पंतप्रधानाच्या निवेदनाला अग्रक्रम मिळाला होता. याबाबतची आकडेवारी प्रसिद्ध झाल्यावर थोडा बदल झाला. फेब्रुवारीच्या दुसऱ्या सप्ताहातही इदिराजी बातम्यांमध्ये होत्याच. फक्त त्याच्या बातम्याना अग्रक्रम देण्याएवजी दुसऱ्या अथवा तिसऱ्या क्रमाकाचे स्थान देण्यात आले होते. वेळेच्या हिशेबात विचार केला तर २० टक्क्याहून जास्त वेळ 'इदिराजी म्हणाल्या' हे सागण्यात खर्ची पडलेला दिसतो; लालाजी म्हणतात, शासनप्रमुखाला इतके असाधारण महत्त्व कम्युनिस्ट देशामधील बातम्यातूनही मिळत नसेल! इंग्लड किंवा अमेरिका याच्या प्रचारमाध्यमाबरोबर तर आपल्या एकाही बातमीपत्राची तुलनाच होऊ शकणार नाही !

इदिराजीच्या पाठोपाठ अन्य मत्रीगण, तसेच काँग्रेस आयचे अन्य नेते याच्या निवेदनाना वगैरे महत्त्व दिले जाते. विरोधी पक्षाना केवळ नाममात्र स्थान दिले जाते. तथापि वेळपेक्षाही ज्या विकृत पद्धतीने विरोधी पक्षाच्या बातम्या दिल्या जातात त्याचा जो तपशील लालाजीनी आपल्या लेखात दिला आहे तो विलक्षण वेधक असून, आकाशवाणीच्या याबाबतच्या विक्षिप्त धोरणावर अचूक प्रकाश टाकणारा आहे. काही बातम्याचा हा तपशील पहा—

(१) 'हिंदुस्थान टाइम्स'च्या भोपाळ येथील ऑफिसवर माझ्या पक्षाच्या लोकानी हल्ला केल्याचे वृत्त खरे असेल तर मी माफी मागतो, असे पत्रक लोकदलाचे अध्यक्ष चौधरी चरणसिंग यानी आज दिल्लीमध्ये काढले आहे.

(२) आसाम आदोलनाच्या नेत्यांनी आपले आंदोलन तातडीने थांबवावे, असे आवाहन कम्युनिस्ट पक्षाच्या नेत्यानी एका पत्रकाद्वारे केले आहे. याच पक्षाच्या मध्यवर्ती कार्यकारी समितीने तसा ठराव एकमताने मजूर केला आहे,

(३) अरस काँग्रेसचे सरचिटणीस श्री. बाका बिहारी दास यानी आपला पक्ष इदिरा काँग्रेसच्या सरकारबरोबर रचनात्मक सहकार्याच्या धोरणाचा कार्यवाही करेल, आसाम प्रश्नाबाबत प्रमुख विरोधी पक्षामध्ये मतैक्य असल्याने या प्रश्नाच्या सोडवणुकीबाबत माझा पक्ष सरकारबरोबर सहकार्याचे धोरण ठेवील असे म्हटले आहे.

या बातम्या विरोधी पक्षाच्या नावावर नोदल्या गेल्या असल्या तरीही सरकारला सोयिस्कर असल्यानेच या बातम्याना आकाशवाणीच्या वार्तापत्रामध्ये स्थान मिळू शकले, असा आरोप अडवानी यानी केला आहे. भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष श्री. अटलबिहारी वाजपेयी यानी आसाम प्रश्नाबाबत जो सात कलमी तोडगा सुचवला, त्याबाबत आकाशवाणीने कसे विक्षिप्त धोरण स्वीकारले होते याचे उत्तम उदाहरण देताना अडवानी म्हणतात, वाजपेयी एका राष्ट्रीय पक्षाचे अध्यक्ष आहेत. जयपूर येथे ११ जानवारी रोजी त्यानी आसाम प्रश्नाबाबतचा आपला तोडगा घोषित केला. दुसऱ्या दिवशी देशामधील सर्व प्रमुख वृत्तपत्रानी वाजपेयी यानी सुचवलेला तोडगा लगोलग ठळकपणे लक्षात येईल अशा पद्धतीने प्रसिद्ध केला. आकाशवाणीने या सात कलमी तोडग्याची जराही दखल घेतली नाही; परंतु या विषयाबाबत जो प्रतिकूल टीका झाली ती मात्र आकाशवाणीने पुरेपूर पोचवली. केंद्रीय गृहमंत्री झैलसिंग, तसेच केंद्रीय शासनामधील राज्यमंत्री व्यंकट सुबय्या व मकवाना यानी वाजपेयी याच्या तोडग्यावर जो टीका केला होती ती आकाशवाणीने जराही कसूर न करता आपल्या श्रोत्यांपर्यंत पोचवली. याच तोडग्याबाबत डाव्या कम्युनिस्ट पक्षाने वाजपेयीवर कठोर टीका केली होती. त्यालाही पुरेपूर प्रसिद्धी देण्यात आली. मूळ तोडगा काय ? याबाबत चकार शब्द न उच्चारणाऱ्या आकाशवाणीने या तोडग्याबाबत झालेली टीका पोचवण्यात जराही कसूर केली नाही.

## दूरदर्शन जास्त पक्षपाती

आकाशवाणी जवळजवळ पूर्णपणे सरकारचा अनुनय करण्यात धन्यता मानत असतानाच दूरदर्शन केंद्रे याबाबतीत एक पाऊल आणखीनच पुढे असल्याचा आरोप लालजीनी केला आहे. पतप्रधानाची सर्वसाधारण भाषणे, त्याच्या भेटीगाठी याला दूरदर्शनवरून दिल्या जाणाऱ्या बातम्यांमध्ये पुरेसे प्राधान्य देतातच, पण या सर्व

कार्यक्रमांवर आधारित असे खास कार्यक्रमही सादर करण्यात येतात. इंदिरा कॉंग्रेसने अलीकडेच जवळजवळ सरकारी खर्चानेच एक प्रचंड किसान मेळावा दिल्लीमध्ये आयोजित केला होता. बातम्यामध्ये तर किसान मेळावा वृत्ताला प्राधान्य होतेच, पण या कार्यक्रमावर आधारलेला तीस मिनिटांचा एक खास कार्यक्रमही दूरदर्शनवरून प्रक्षेपित करण्यात आला. एका राजकीय पक्षाने भरवलेल्या या मेळाव्याची एवढ्या विस्ताराने दखल घेण्याचे कारण काय, असा प्रश्न विचारून लालाजी भाष्य करतात,

बातम्याची निवड करण्याबाबत आकाशवाणीची काही मार्गदर्शक तत्वे आहेत. बातमीचे मोल लक्षात घेऊन समतोल पद्धतीने बातम्यांची निवड करावी असे जे प्रमुख मार्गदर्शक तत्व आहे त्याचेपालन होत नसल्याबद्दल खेद व्यक्त करून लालजींनी जनता शासन असताना या तत्त्वाचे कसे पालन होत होते याची आकडेवारी दिली आहे त्यावेळी स्वपक्षीयांकडून आपल्यावर कशी टीका झाली याची काही उदाहरणेही त्यानी दिली आहेत. पक्षातर्गत संघर्षाबाबतच्या बातम्या आकाशवाणी व दूरदर्शनवरून प्रसृत होऊ लागल्यावर स्वपक्षीयानी आपल्यावर कशी टीका केली त्याची आठवण जनता पक्षाच्या शासनामधील या माहिती आणि नभोवाणीमंत्र्यानी दिली आहे. ते म्हणतात, पक्षांतर्गत भांडणाना आकाशवाणी व दूरदर्शनवर प्राधान्य दिले जाते, असा आरोप केल्यावर मी म्हणालो, पक्षातर्गत भांडणे थांबवणे हाच त्यावर उपाय आहे. या बातम्याबद्दल जनतेला उत्सुकता असल्याने त्याना योग्य ती प्रसिद्धी देणे हे प्रसिद्धी माध्यमाचे कामच आहे. याबाबतच्या बातम्या दडपून टाकणे हा काही उपाय होऊ शकत नाही.

### स्वायत्ततेचे धोरण उपकारक

आकाशवाणी आणि दूरदर्शनला स्वायत्तता देण्याबाबत आपल्या पक्षाकडून ज्या चुका झाल्या त्याचीही प्रांजळ कबुली अडवानीजीनी या लेखात दिली आहे. ते म्हणतात, निवडणूक प्रचारसभामधून आम्ही प्रचार माध्यमांना स्वायत्तता देण्याबाबत बोललो होतो. आम्ही सत्ताग्रहण केले त्या वेळी चंदा समितीचा अहवाल तयार होता. त्याच्या आधारे स्वायत्ततेचे धोरण राबवता आले असते, परंतु तसे न करता आम्ही आणखी एक समिति नेमली-वर्गिस समिती. या समितीने आपल्या शिफारशीमध्ये प्रचार माध्यमांना पूर्ण स्वातंत्र्य देण्यात यावे असे सुचवले होते. आम्हाला ते पटले नाही. स्वायत्तता देण्याबाबत आमची बांधिलकी होती. प्रचार माध्यमाच्या स्वातंत्र्याचा पुरस्कार आम्ही केला नव्हता. तरीही 'प्रसार भारती 'बाबतचा जो कायदा आम्ही आणू पहात होतो तो जर मार्गी लागला असता तर देशामधील कोणत्याही सार्वजनिक संस्थेपेक्षा प्रचार माध्यमांना स्वायत्तता मिळाली असती. तुलनाच करायची असली तर म्हणता येईल की, बी. बी. सी.ला धोरणाबाबतचे जे स्वातंत्र्य आहे त्यापेक्षाही जास्त आम्ही देऊ केले होते. चंदा समितीने सुचवलेली स्वायत्तता आणि वर्गिस समितीने सुचवलेले प्रचार माध्यमाचे स्वातंत्र्य याचा सुवर्णमध्य साधला जाईल अशा पद्धतीनेच 'प्रसारभारती 'चे विधेयक बनवले होते. ते कायद्यामध्ये परिवर्तित होऊ शकले नाही ही दुर्दैवाची बाब मानावी लागेल. केवळ करमणूक करणे अथवा माहिती देणे हे प्रचार माध्यमाचे काम नाही. समाजशिक्षण करणे आणि लोकशाही विकसित करण्यासाठी हातभार लावण्याची जबाबदारी ही प्रचार माध्यमाना उचलावी लागणार असल्याने त्याना स्वायत्तता मिळणे जरूर आहे. विद्यमान शासनाने स्वायत्ततेची कल्पना गुडाळून ठेवली असून आकाशवाणी व दूरदर्शन यावर पूर्णपणे शासनाचे नियंत्रण आहे. लेखाचा समारोप करताना लालजी म्हणतात-समितीने प्रचार माध्यमांनी सत्तेवर असलेल्या पक्षाचे धोरण व दृष्टिकोण यांचा पाठपुरावा करण्याची गरज नाही असे म्हटले असले तरी सध्या तरी आकाशवाणी व दूरदर्शन हे इंदिरा कॉंग्रेस व इंदिरा कॉंग्रेसचे सरकार यापलीकडे पाहू शकत नसल्याने लोकशाही बळकट करण्यासाठी या माध्यमाचा उपयोग नाही. ¤

## □ बिहारमधील एका सोनेरी टोळीचा शोध

सरकारी कामकाजाची पद्धती ज्याला चांगली माहिती आहे त्याला या पद्धतीमधील कच्चे दुवेही चागले माहिती असतात. टी. पी. सिंग उर्फ गुरुसारखा तिरके डोके असलेला एखादा मनुष्य व्यक्तिगत लोभापायी हे कच्चे दुवे अचूक हेरतो आणि संबंधित खात्याला टोपी घालून लक्षावधी रुपयांची अफरातफर करू शकतो. बिहारमधील या ठकसेनाचे खरे स्वरूप अलीकडे केवळ योगायोगाने उजेडात आले. कोळशाबाबतचा परवाना कसा दिला जातो याचा पद्धतशीर अभ्यास करून या गृहस्थांनी बनावट कागदपत्रे तयार केली. या व्यवहारात संबधित असलेली आणि मोक्याच्या जागा अडवून बसलेली दोन-तीन माणसे त्याने हाताशी धरली आणि बनावट कागदपत्राच्या आधारे परवाने मिळवून केवळ दोन वर्षांच्या कारकीर्दीमध्ये चार ते पाच कोटी रुपयाची अफरातफर केली. या अफरातफरीमागील प्रमुख सूत्रधार टी. पी. सिंग नावाचा गृहस्थ असल्याचे उघड झाले असले तरी पोलीस अजूनही त्याला अटक करू शकले नाहीत !

या सिंगमहोदयांचा इतिहास तसा मोठा रोचक आहे. मनुष्य पहिल्यापासूनच गुन्हेगारी प्रवृत्तीचा. लहान-सहान गुन्हे पचवत त्याने धनबादमधील कोळसा-परवानाव्यवहारामध्ये आश्चर्य वाटावे एवढी प्रचंड अफरातफर करून दाखवली आहे ! बिहारमधील या आधुनिक ठकसेनाचे हे सारे प्रकरण 'इंडिया टूडे' या पाक्षिकाने प्रसिद्ध केले आहे.

पश्चिम बंगालमधील पुरुलिया जिल्ह्यामधील मधुकुंड नावाच्या एका छोट्या खेड्यामध्ये जन्मलेल्या या सिंगसाहेबानी आर्थिक गुन्हेगारीच्या जगात अलीकडच्या काळामधील सगळ्यात मोठी अफरातफर करून आपले नाव कायमचे नोंदवून ठेवले आहे. या महोदयाची कारकीर्द एका छोट्या कोळशाच्या खाणीतच सुरू झाली. चोरून कोळसा विकला तर बऱ्यापैकी पैसा मिळू शकतो हे लक्षात आल्यानंतर दोन-चार कामगार हाताशी धरून त्याने पद्धतशीरपणे कोळसा विकण्यास प्रारंभ केला. तथापि पैसे कसे वाटून घ्यावेत यावरून त्याचे त्याच्या साथीदारांबरोबर मतभेद झाल्यावर त्यांच्यापैकी एकाने पोलिसाना खबर दिली आणि सिंग नावाचे गृहस्थ प्रत्यक्ष चोरी करतानाच पकडले गेले. केवळ नोकरी जाण्यावर हे प्रकरण निभावले. ही नोकरी गेल्यावर काही दिवसातच त्यांनी रेल्वे खात्यात नोकरी मिळवण्यात यश मिळविले. येथेही त्याने आपले जुने उद्योग चालूच ठेवले. वॅगनमध्ये कोणत्या स्वरूपाचा माल आहे याचा तपशील वॅगन फोडून चोऱ्या करणाऱ्या एका टोळीला पुरवण्याची जबाबदारी त्याने स्वीकारली. काही दिवस हा व्यवहार सुरळीतपणे चालू होता, परंतु एका

रेल्वे-अधिकाऱ्याला टी. पी. सिंगच्या पहिल्या नोकरीबाबतची माहिती समजली. त्यांनी या माणसावर लक्ष केन्द्रित केले आणि काही दिवसातच एका वॅगन-चोरी प्रकरणात त्याला मुद्देमालासह अटक करण्यात आली. गुन्हेगार म्हणून शिक्का बसला असला तरी आपल्या जुन्या नोकरीबाबत किंवा पूर्वीच्या गुन्ह्या बाबतचा सारा तपशील लपवून ठेवायचा आणि आपण प्रथमच नोकरी करू इच्छित आहोत असे भासवून काम मिळवायचे, असे तंत्र अवलंबून त्याने दुर्गापूरच्या स्टील प्लान्टमधील भोजनगृहामध्ये निरीक्षक म्हणून काम मिळवण्यात यश संपादन केले. नेहमीप्रमाणे पहिल्या दिवसापासूनच येथे आपल्याला कशा प्रकारे लाडीलबाडी करता येईल याचा विचार करून त्याने काही योजना निश्चित केली आणि बनावट पावत्या तयार करून बघता बघता हजारो रुपयाची अफरातफर केली. खोट्या नोंदी करणे, बनावट पावत्या करणे यासारखे आरोप तर सिद्ध झालेच, पण त्याखेरीज अन्य दहा-बारा प्रकरणातही टी. पी. सिंग याचा हात असल्याचे उजेडात आले. यापैकी काही खटले तर अजूनही न्यायालयासमोर चालू आहेत. एवढे सारे प्रकार उजेडात आल्यावर नोकरी गेली हे वेगळे सांगायला नकोच. आर्थिक स्वरूपाचे गुन्हे करणे हा प्रकार जसा सिंगच्या अंगवळणी पडला होता तसेच हाती असलेली नोकरी जाणे ही पण त्याच्या दृष्टीने नित्याचीच बाब होती. नोकरी गेल्यावर नवीन नोकरी मिळविण्यासाठी बनावट कागदपत्रे तयार करण्याचे तंत्र त्याने अवलंबिले. असेच बनावट कागदपत्र तयार करून ईस्टर्न कोलफील्ड लिमिटेड या कंपनीच्या कोळसा वितरणविभागामध्ये त्याने नोकरी मिळवली. कोळसावितरण ही काय चीज आहे हे त्याच्या लवकरच लक्षात आले. कोळसा वितरणपत्र हातात पडावे, यासाठी संबंधित मंडळी काय वाटेल ते करण्यास तयार असतात, हे समजून चुकल्यावर त्याने बनावट परवाने देण्याचा सपाटा सुरू केला. मर्यादित प्रमाणात हा व्यवहार त्याने केला असता तर कदाचित हे प्रकरण कधीच उजेडात येऊ शकले नसते; पण ज्या खाजगी कंपनीला एखादा परवाना मिळू शकत असे अशा कंपनीला त्याने चौथा परवाना दिल्यावर, हे बनावट परवान्याचे प्रकरण उजेडात आले. त्या वेळेपर्यंत सिंगजवळ बऱ्यापैकी पैसा जमा झाला होता. त्याच पैशाचा वापर करून त्याने यातील बरीच प्रकरणे दाबून टाकली आणि या कंपनीच्या व्यवहारातून आपली सुटका करून घेतली. दरम्यानच्या काळात ज्यांना कोळसा मिळू शकेल अशा काही बोगस कंपन्या तयार करून त्याने नवीन खोटी गिऱ्हाइके तयार केली. बनावट परवान्याच्या आधारे कोळसा मिळवता आला तर सोन्याच्या किंमतीने त्याचा व्यवहार होऊ शकतो, हे लक्षात आल्याने याच व्यवहारामध्ये त्याने आपली सारी बुद्धी पणाला लावली.

धनबाद येथील कोळसा कंपनीमधील संबंधितांशी सतत संपर्क ठेवून असलेल्या विश्वनाथ अग्रवाल नावाच्या माणसाशी त्याने संपर्क साधला. आपला पूर्वेतिहास त्याला सांगून, बनावट कागदपत्रे तयार करायची, संबंधित अधिकाऱ्याच्या खोट्या सह्या करायच्या आणि कोळसा मिळवून, कात्रामोर या कोळशाच्या गैरव्यवहारासाठी प्रसिद्ध असलेल्या केंद्रातून हा गैरमार्गाने संपादन केलेला सारा कोळसा विकायचा अशी ही योजना होती. अग्रवालने सहकार्य देण्याचे कबूल केले. शर्मा आणि अरोरा नावाचे आणखी दोन साथीदार मिळाले. प्रामुख्याने लोह-उद्योगाला अतिशय आवश्यक असलेल्या हार्ड कोकबाबतचा हा व्यवहार होता. या मंडळीच्या सुदैवाने या हार्ड कोकला फार मोठी मागणी असली तरी हार्ड कोकचे उत्पादन अपुरे होते. स्वाभाविकपणे बनावट कागदपत्राच्या आधारे यांनी मिळवलेल्या हार्ड कोकला मागणी उत्तम होती. जवळजवळ दोन वर्षे हा व्यवहार अत्यंत सुरळितपणे चालू होता. बनावट कंपन्यांच्या नावे, बनावट परवाने मिळवायचे आणि ते परवाने तरी विकायचे किंवा कोळसा हस्तगत करून तो तरी विकायचा असा हा व्यवहार होता.

### बघता बघता लक्षाधीश

धनबादमध्ये घाबरत घाबरत पाऊल ठेवणाऱ्या या ठकसेनाने बघता बघता प्रचंड मालमत्ता उभी केली. गैरव्यवहार करायचे, पैसा मिळवायचा आणि मिळवलेल्या या पैशाचा ताकदीप्रमाणे वापर करून केलेले गैरव्यवहार पचवायचे आणि आणखी धाडसी पावले टाकायची, असे आक्रमक धोरण स्वीकारल्याने, गुरु एक सामर्थ्यशाली व्यक्ती म्हणून ओळखला जाऊ लागला. ज्यांना नियमितपणे कोळसा मिळत असे अशा काही मान्यवर कंपन्यांना या काळ्या व्यवहाराची थोडी-फार कल्पना आली. तीन-चार कंपन्यांनी संयुक्तपणे तक्रार करून उद्योग मंत्रालयापर्यंत हे प्रकरण नेले. चौकशीची चक्रे फिरू लागली आणि पोलीस खातेही चक्रावून जावे अशा किती तरी गोष्टी उजेडात आल्या. या साऱ्या प्रकरणामागे सिंग आहे हे लक्षात आल्यावर पोलिसाचे काम सोपे झाले. त्याच्या कचेरीवर छापा घातला असता ज्या कंपन्या मुळातच अस्तित्वात नाहीत अशा दहा कंपन्याचे खोटे कागदपत्र व लेटरहेड्स् पोलिसांनी सिंगच्या कचेरीतून जप्त केली. त्याच्या व्यक्तिगत आयुष्याची चौकशी केली असता मालती सिन्हा नावाच्या बाईबरोबर त्याचे संबंध आहेत ही गोष्ट उजेडात आली. पोलिसांनी या बाईच्या घरावर छापा घातला तेव्हा दोन लाख रुपयांचे दागदागिने आणि दीड लाख रुपयाहून जास्त रोकड हाती लागली. हे आपल्याला सिंगने दिले, यापेक्षा जास्त ती काहीही सांगू शकली नाही. सिंगने आपल्या मूळ गावी म्हणजे मधुकुंड येथे दोन मजली इमारत बांधली आहे. राणीगंज येथे त्याने फार मोठी मालमत्ता केली असून मोठ्या रकमा ठेवी म्हणून गुंतवल्या आहेत, या गोष्टीही उजेडात आल्या. कलकत्ता येथे त्याचा अलीशान बंगला असून पोलिसांनी न्यायालयामार्फत तो सध्या आपल्या ताब्यात घेतला आहे.

चारीही बाजूनी सिंगची आर्थिक नाकेबंदी केली असली तरी पोलिसांच्या हातावर तुरी देऊन पळ काढण्यात त्याने यश मिळवले आहे. तथापि त्याचे अनेक साथीदार चांगलेच गोत्यात आले असून पोलिसांनी एकूण १७ लोकांना अटक केली आहे. अनेक बडी धेंडे या प्रकरणात गुतली असून सिंगपर्यंत लवकर पोचणे अवघड आहे, असे एका पोलीस अधिकाऱ्यानेच बोलून दाखवले. तो म्हणाला, या सोनेरी टोळीचे रक्षण करणारी मंडळी दिल्ली, पाटणा आणि कलकत्ता येथे बसली असून या साऱ्या प्रकरणाचा खरा तपास करत असताना आम्हाला अनेक अडचणीना तोंड द्यावे लागणार आहे. पण कागदोपत्री पुरावा इतका मजबूत आहे की, सिंग आणि त्याचे साथीदार सुटणे ही अशक्यप्राय गोष्ट आहे. गेल्या दशकामधील सगळ्यात मोठी अफरातफर म्हणून या सिंगच्या सोनेरी टोळीच्या पराक्रमांची नोंद करावी लागेल.

□

गुजराथच्या मेडिकल विद्यार्थ्यांचे आंदोलन

# दादुमियांच्या डायरीतील काही पाने

(हप्ता शेवटचा)

## नऊ मार्च

सकाळी एका दोस्ताचा फोन मोठ्याने खणखणतो. 'दादुमिया, आपण मागे म्हणाला होता ते खरे झाले.'

'काय?' मी जांभई देतो.

'आज पेपर वाचला नाही की काय? वाचा. वाचा! आज प्रबोध रावळ या गृहमंत्र्यांनी या आंदोलनासाठी आर. एस. एस. जबाबदार आहे असे म्हटले आहे. ठळक हेडलाइन दिली आहे! तुम्ही दहा दिवसांपूर्वीच भाकीत केले होते!'

'हूं,' मी पुन्हा जांभई देतो.

चहा पिऊन मी ताजा होतो व पेपर वाचतो. रावळाच्या पोलिसांजवळ बरेच कागदपत्र आहेत, त्या पुराव्यावर ते हा संघाचा हात सिद्ध करायला केव्हाही तयार आहेत. हा पुरावा पोलिसानी आठ निरनिराळ्या जागी छापे घातले त्यांत त्याना मिळाला; त्यांत बऱ्याच चक्रमुद्रित पत्रिकाही आहेत. रमेश गांधी व भरत अमीन या दोघा तरुण डॉक्टरांना एन. एस ए. खाली अटक करण्यात आली आहे; गांधी संघाचा स्वयंसेवक आहे. आंदोलनाचा प्रमुख आहे. पण खरा सूत्रधारक डॉ. वैष्णव आहे. साऱ्या गुजराथ राज्यात अशांतता पसरविण्याचा डॉ. गांधीचा हेतू आहे, इत्यादी इत्यादी सरकारी प्रचार.

'पण संघाचे कोणते नेते या आंदोलनास जबाबदार आहेत?' पत्रकारांनी गृहमंत्री रावळ यांना विचारले.

त्या प्रश्नाचे उत्तर गृहमंत्र्यानी देण्याचे टाळले. काही संघाचे नेते मुद्दाम आसामात जाऊन आले होते, तेथे आंदोलन इतके दिवस कसे चालवितात ते पहाण्यासाठी, त्याचा अभ्यास करण्यासाठी. त्यांच्या क्षुद्र राजकीय स्वार्थासाठी हे संघीय नेते साऱ्या विद्यार्थ्यांना चुकीचे मार्गदर्शन करून राहिले आहेत. 'राम दरबारा' सारखा धार्मिक समारंभ; पण तोही या संघीय नेत्यांनी डिस्टर्ब करण्याचा प्रयत्न करून पाहिला. मध्यम वर्गीय वस्त्यांतून हे संघीय डॉक्टर्स पत्रिका वाटतात व लोकाना पेटवितात. वर म्हणतात, ह्या पत्रिका दलित पँथर्सचे लोक वाटतात. आता तर याची मजल गांधीनगरात पत्रिका वाटण्यापर्यंत गेली आहे.

'या संघीय नेत्याच्या हातातले बाहुले बनू नका, त्याना उघडे पाडा व सध्याचे हे अशांत व तप्त वातावरण थंड करण्यास सरकारला मदत करा!' असे आवाहन गृहमंत्री प्रबोध रावळ यानी आम जनतेला केले आहे.

पत्रकारांना एन. एस. ए. खाली किती लोकांना अटक झाली ह्या प्रश्नाचे उत्तर देताना प्रबोध रावळ म्हणाले, 'अहमदाबाद शहरात आतापर्यंत ३९ व साऱ्या राज्यात मिळून ६१.

◘

आज वृत्तपत्रांत सरकारच्या प्रचाराचा चांगला मासला वाचावयास मिळाला. 'अहमदाबादेत आता पुन्हा शांतता प्रस्थापित झाली आहे. फक्त रायपूर–खाडिया विभागात पोलिसांवर जमावाने खूप पथ्थरबाजी केल्यामुळे पोलिसांना साऱ्या दिवसभर जमावावर अश्रुधूर सोडावा लागला. दरियापूर विभागातून तर आता कर्फ्यू काढून टाकण्यात आला आहे.'

'भावनानगरमध्ये विद्यार्थ्यांचा संप चालू आहे. राजकोट व जुनागढ येथेही संप (हरताळ) चालू आहे.'

'गृहमंत्री प्रबोध रावळ म्हणतात की आता साऱ्या गुजराथमध्ये शांतता प्रस्थापित झाली आहे,'

'अहमदाबादेत रात्री अकरा ते पहाटेचे पाच असा कर्फ्यू चालू आहे.'

'संघाच्या नेत्यानी गेल्या वर्षी असेच भडकवण्याचे प्रयत्न केले होते. त्या वेळेस त्याची सबब होती, सर्व वस्तूंच्या वाढलेल्या किमती.'

वाजपेयजीचे स्टेटमेंट आज साऱ्या वृत्तपत्रानी ठळकपणे प्रसिद्ध केले आहे.

राज्यगृहमंत्री मकवाना यानी या आंदोलनामागे भा. ज. प. आहे व राखीव जागा अवर्णांना देऊ नयेत असे भा. ज. प. चे मत आहे असे जे खोडसाळपणे म्हटले आहे त्याचा वाजपेयजीनी जोरात इन्कार केला आहे. राष्ट्रीय एकात्मता मंडळाची बैठक राखीव जागांचा प्रश्न चर्चिण्यासाठी ताबडतोब बोलवावी, असे त्यानी पत्रकारांना सांगितले. हे आदोलन का वाढले याची दोन कारणे वाजपेयजीनी सागितली, 'इंदिरा काँग्रेसमधली गटबाजी व पोलिसांची अविवेकी व अतिरेकी वागणूक–सत्ताधारी पक्ष योग्य ती दक्षता घेण्यास असमर्थ ठरला आहे. पोलिसांनी उगीचच गोळीबार केला नसता तर हे आदोलन एवढे उग्र झाले नसते'

वाजपेयीजी म्हणाले, 'तीन घटनाची जाहीर चर्चा व्हावी. राखीव जागा ठेवूनही हरिजन व गिरिजन यांची राजकीय, आर्थिक व शैक्षणिक परिस्थिती सुधारत का नाही? गरिबी फक्त हरिजन–गिरिजन विभागात दिसत नाही, ती इतरातही आढळते. हरिजन व गिरिजनात २१ टक्के लोक दारिद्र्यरेषेखाली आहेत, तर इतर लोकात हे प्रमाण २७ टक्के आहे. तिसरी गोष्ट, राखीव जागांवरून लोकांत असंतोष का वाढत आहे?'

◘

आज बडोद्यात राजनारायण येणार आहेत. त्यांना मी भेटायला खूप उत्सुक आहे. जुनी ओळख आहे.

मी डॉ. व्यासना फोन करतो आम्ही दोघेजण सर्किट हाउसवर जातो. एका मोठ्या हॉलमध्ये सोफ्यावर राजनारायण बसले आहेत, समोर बशीत चणे व गरम चहा. हॉलमध्ये चिक्कार गर्दी. सारे

बी. सी. आमचे स्वागत होते. 'आ आदोलनना संचालको' अशी आमची ओळख करून देण्यात येते.

आम्ही गरम होतो. आम्ही या आंदोलनाचे संचालक नाही, बरोडा मेडिकल युनियनचे जे कार्यकारी मंडळ आहे त्याचे आम्ही सभासद आहोत. डॉ. व्यास त्याचे कार्यसचिव आहेत, हरिजनाविषयी आम्हास आपुलकी वाटते–मी आमच्याविषयी सांगू लागतो.

एवढ्यात कोणी तरी ओरडते, 'मेडिकल युनियनही ये सब आंदोलन चला रही है। और ये दोनो सवर्ण उसके अधिकारी है।' जमलेल्या साऱ्यांच्या चेहेऱ्यांवर क्रोध व द्वेष उफाळताना दिसला.

त्या हॉलमध्ये आम्ही तिघेच सवर्ण होतो. बाकी सारे अवर्ण. चिडलेले, संतापलेले, एकमेकांशी हळूहळू कुजबुजणारे.

राजनारायणांना मेडिकल युनियनचे मत ऐकून घ्यायचे होते. आम्ही सविस्तर त्याना सर्व घटना तारीखवार सांगू लागलो.

प्रत्येक घटना सांगून झाली की, पाठीमागून संतापाने कोणी तरी गर्जना करी, 'यह झूट है, यह बकवास है!'

लगेच बी. सी. पुढारी त्यांना शात करीत, 'अरे, एमनी साईड समजाववा हो, पछी तमे बोलो.'

हळूहळू आम्ही कॉलेजमधील अवर्ण मुले कोण त्याची माहिती सांगू लागलो. 'उदाहरणार्थ, विश्वनाथ गव्हर्नरांचा मुलगा.'

एकदम दहा-बारा लोक उठून उभे राहिले, 'विश्वनाथ बी. सी. नही थे, वे ब्राह्मण थे।'

मी गरम झालो, उभा राहिलो व म्हणालो, 'मैं विश्वनाथजीको अच्छी तरहसे जानता था। उनसे मै कई बार मिला हूँ।'

'हम भी उनसे कई बार मिल चुके है। वे ब्राह्मण थे।'

'उनके डॉक्टर सनको भी मै अच्छी तरहसे जानता था।'

'हम भी उनको जानते थे।'

आता गलवला वाढत चालला. राजनारायण खूप भडकले. एकदम ते जोरात ओरडले, 'खामोश, चूप बैठते हो या नही?'

अवर्ण पुढाऱ्यांनी उभे राहिलेल्याना बसविले व चूप बसविले.

मी म्हणालो, 'मी तर 'दलिताचे राजकारण' हा ग्रंथ लिहिला आहे.' एकदम एकजण उठला व म्हणाला, 'ऐसे किताबे तो लिखते हैं. कृष्णने गीता लिखीही है ना? और उन्होनेही हमको ये शूद्र बना ये ना? नालायक, बदमाष.' त्याला पुढाऱ्यांनी चूप बसविले.

आम्ही पुढे सांगू लागलो व पेपरमध्ये हे सारे आले होते त्याचा हवाला देऊ लागलो.

एकदम आमच्यावर बॉंबवर्षाव सुरू झाला. 'ये पेपर्स सवर्णोंके हाथों मे है। सब उनकाही छापते हैं। हमारा कोई छापते नही है। ये दोनो बकवास करते है और शातीसे आप सुन रहे हैं। क्यूं सुनते हो उनको?'

'अरे भाई, आपका भी मुझे सुनना पडेगा। पहला उनका मुझे सुनना दो।'

'क्यू उनका पहले?'

एवढ्यात राजनारायणांचा दिल्लीहून ट्रंककॉल आला. पुढाऱ्यांनी सर्वांना शात बसविले. आम्हाला चहा देण्यात आला. 'इंडियन एक्सप्रेस'चे किरीट भट आले. त्यांनाही चहा देण्यात आला. राजनारायणांसमोर फुटाण्याची बशी होती. त्यातील फुटाणे हातात घेऊन ते मी खाऊ लागलो व काही डॉ. व्यासना दिले. त्याना म्हणालो, 'हनुमानजीका प्रसाद!'

ट्रंककॉल दिल्लीचा होता. दुसऱ्या दिवशी लखनौस मागासलेल्या वर्गाची कसलीशी मोठी परिषद होती. कसेही करून तुम्ही उद्या तेथे या, अशा अर्थाचा तो ट्रंककॉल होता.

सारी सभा स्तब्ध होती.

ट्रंककॉल चालूच होता.

एका हाताने स्पीकर दाबून ठेवीत मला राजनारायणानी विचारले, 'भाई, यहाँसे भागनेके लिये कोई रास्ता है?'

मी म्हणालो. 'है.'

माझ्या तोंडाजवळ कान नेत ते म्हणाले, 'जलदी बताव.'

'यहाँ आपको जो देखना है वो सब दोपेरतक देख लो. चार बजे तक अहमदाबाद पहुँच जाव। चारसे रात तक अहमदाबाद सब देख लेना! कल सुबह प्लेन में बैठकर सात बजे दिल्ली पोंच जाना। सातसे साठेआठ लखनौ।'

'शुकरिया,' राजनारायण मला म्हणाले व उजवा पंजा काढून घेऊन टेलिफोनवर बोलू लागले, 'मैं कल वहाँ पोच जाऊंगा। सुबह आठ तक।'

पुन्हा गलबला सुरू झाला.

'आप जा नही सकते,' आता बी. सी. पुढारी जोरजोरात ओरडू लागले, 'आजका पुरा दिन बडोदामे, कलका पुरा दिन अहमदाबादमे–'

'अहमदाबादमे तो दो दिन रहना चाहिये।' कोणाची तरी गर्जना.

पुन्हा 'गप्प बसा,' 'गप्प बसा'चा कोलाहल सुरू झाला.

मी व डॉ. व्यास तेथून हळूच निसटलो.

'मैं पिछडे जमातीके कॉन्फरन्सके लियेही जा रहा हूं।' राजनारायण त्यांना समजावीत होते.

'हम आपको जाने नही देंगे।'

मी उठत होतो तेव्हा त्याचा पुढारी माझ्या कानात म्हणतो, 'आ जोया अमारा लोगो?' (आमचे लोक पाहिलेत ना?)

'हुं सारी रीते जाणु छु. हवे हुमे भागिएछे.'

आम्ही बाहेर आलो, गाडी स्टार्ट केली व सर्किट हाउसपासून दूर आलो.

'येथे सवर्णाविरोधी एवढा द्वेष तर अहमदाबादेत काय असेल?' डॉ. व्यास मला विचारतात.

'एवढे हेकलिंग आपण पहिल्यांदाच अनुभवले असेल.'

'What a terrible experience!'

---

## दहा मार्च

---

शेवटी अहमदाबादेच्या ऑनररी डॉक्टरानी विद्यार्थ्यांना दाखविलेला पाठिंबा काढून घेतला. ऑनररीची सभा झाली व त्यात खूप खडाजंगी चर्चा झाली. ६५ लोकानी हा पाठिंबा काढून घ्यावा असे मत दर्शविले, तर त्याना ४७ ऑनररी डॉक्टरांनी विरोध केला.

पृष्ठ २१ वर

बारामतीचे साहित्यशिबीर

# मराठी कथेची कुंडली मांडण्याचा प्रयत्न

डॉ. भीमराव कुलकर्णी

साहित्य समेलनातून होणाऱ्या साहित्यविषयक चर्चेसंबंधी एक असमाधानाचा सूर नेहमीच प्रकटत राहतो. साहित्य-संमेलनाच्या आजच्या स्वरूपामुळे अशी चर्चा तेथे अपेक्षित नसते हे अशा वेळी लक्षात घेतले जात नाही. गंभीर आणि मौलिक स्वरूपाची साहित्य-चर्चा करण्याचे संमेलन हे काही व्यासपीठ नव्हे, याची यथार्थ जाणीव ठेवली तर त्यासंबंधी वारंवार असमाधान प्रकट करण्याची आवश्यकता नाहीशी होते. अलीकडे गेल्या काही वर्षांत साहित्यचर्चाविषयक जी शिबिरे विद्यापीठ अनुदान मंडळाच्या तुटपुंज्या आर्थिक पाठबळावर भरविली जात आहेत, त्यांनी खऱ्याखुऱ्या साहित्य-चर्चेला तोंड फुटते आहे. तीन-साडेतीन वर्षांपूर्वी पुण्याच्या मॉडर्न महाविद्यालयामध्ये सात दिवसाचे असे एक महत्त्वाकांक्षी शिबीर भरले होते. त्यामध्ये महाराष्ट्रातील जवळजवळ सारे महत्त्वाचे नवे-जुने समीक्षक एकत्र आले होते. ही एक प्रकारे अभूतपूर्व घटनाच मानावयास हवी. त्यानंतर सांगली (विलिंग्डन महाविद्यालय), कोल्हापूर (शिवाजी विद्यापीठ), धुळे (विद्यार्थिनी महाविद्यालय) इत्यादी ठिकाणची अशा प्रकारची शिबिरे खूपच गाजली. अर्थातच 'मॉडर्न'प्रमाणे सात दिवसाची शिबिरे घेणे अत्यंत जिकिरीचे असल्याने ही शिबिरे दोन वा तीन दिवसावर मर्यादित करण्यात आली. गेल्या दोन-तीन वर्षात अनेक ज्येष्ठ समीक्षकांना काळाने ओढून नेल्याने आणि वृद्धत्वामुळे अनेक ज्येष्ठ समीक्षकांची अनुपस्थिती आजच्या शिबिरातून प्रकर्षाने जाणवते.

अगदी अलीकडे बारामतीच्या चतुरचंद महाविद्यालयाने अनेक विषयावरची शिस्तबद्ध शिबिरे भरविण्यात चांगलीच आघाडी मारली आहे. बारामतीचे उत्साही प्राचार्य ज. के. गोधा यांनी अल्पावधीतच आपल्या महाविद्यालयाची सर्वांगीण वाढ करण्यात लक्षणीय यश मिळविले आहे. गेल्या वर्षी या महाविद्यालयाने एक समीक्षाविषयक शिबीर भरविले होते; परंतु त्याची म्हणावी तशी वाच्यता झाली नव्हती. यदा मार्चच्या चौदा-पंधरा तारखेला झालेल्या मराठी कथाविषयक शिबिराने मात्र अनेक जाणकारांचे लक्ष वेधून घेतले आहे. 'गेल्या दोन दशकातील मराठी कथेतील नवता व परंपरा' या विषयावर हे शिबीर भरले होते. गंगाधर गाडगीळ, डॉ. स. ग. मालशे, प्रा. वसंत दावतर, डॉ. आनंद यादव, डॉ. गं. ना. जोगळेकर, डॉ. अंजली सोमण, डॉ. ह. बा. कुलकर्णी, प्राचार्य शिवाजीराव भोसले, प्रसिद्ध कथालेखिका कमल देसाई आणि ह. मो. मराठे, डॉ. तोडमल इत्यादिकांच्या उपस्थितीने आणि त्यांनी उपस्थित केलेल्या मराठीतील कथाविषयक प्रश्नांनी दोन दिवस बारामती महाविद्यालयाचे सारे वातावरण अक्षरशः साहित्यमय बनून गेले होते.

### वीस वर्षांत कथा दुबळी झाली !

एकंदर मराठी कथेच्या पार्श्वभूमीवर गेल्या दोन दशकातील मराठी कथावाङ्मयाचा विचार करीत असताना चर्चा अपरिहार्यपणे महायुद्धोत्तर काळातील मराठी कथेच्या बहराकडे पुनःपुन्हा वळत होती. मराठी कथेला 'कथा' म्हणून सर्वांगाने मुक्त करण्याचे श्रेय गंगाधर गाडगीळांकडेच जाते, याबद्दल कुणाचे फारसे दुमत नव्हते आणि मराठी ग्रामीण कथेतील व्यंकटेश माडगूळकर आणि शंकर पाटील यांच्या कामगिरीबद्दलही एखाद-दुसरा अपवाद वगळता बहुतेकांच्या कल्पना अगदी स्पष्ट होत्या. मात्र गेल्या दोन दशकातील मराठी कथावाङ्मय आणि गेल्या दोन दशकांमध्ये पूर्वीप्रमाणेच अग्रगण्य राहिलेल्या जी. ए. कुलकर्णी यांच्या कथेखेरीज केवळ कथा या वाङ्मयप्रकारात जिद्दीने नवे काही करून दाखविणारा कथाकार अभावानेच दिसतो, याची अनेक वेळा जाणीव करून देण्यात आली. ती देत असताना गेल्या दहा-पंधरा वर्षांत नव्याने लिहीत असलेल्या कथाकारांच्या नावाचा आवर्जून उल्लेख करण्यात आला; त्यांच्यापैकी कोणा एकाचा वा दोघा-तिघांचा (पूर्वीच्या गाडगीळ-गोखले-भावे-माडगूळकर) मराठी कथेवर महत्त्वाचा परिणाम घडला नाही, त्याची कारणमीमांसा करण्यात आली. 'सत्यकथा' आणि सत्य-कथेतर कथा असे मराठी कथेत उघडउघड दोन तट पडले असून सत्यकथेतील कथाच अलीकडे इतकी दुबळी झाली आहे की, तिची नवे निर्माण करण्याची क्षमताच नष्ट झाली आहे. सत्यकथेतर कथा दिशाहीन असल्याने ती बाजारी बनली आहे, असाही एक सूर उमटला. एकंदर चर्चेचे हे ठळक फलित मानावयास हरकत नाही. डॉ. अंजली सोमण यांनी अलीकडच्या कथावाङ्मयाचा नेटका आढावा सादर करून या चर्चेला चांगले तोंड फोडले.

### चांगली कथा कालातीत असते

काही लेखक कुठल्याच कालातील नसतात. ते स्वतंत्र, स्वयंभू असतात असे म्हणूनमराठीतल्या महत्त्वाच्या कथाकारांच्या वैशिष्ट्याकडे आपल्या उद्घाटनाच्या भाषणातून लक्ष वेधले गंगाधर गाडगीळांनी. मराठी कथेतील अनेक बंदिस्त दालने नव्या उत्साहाने उघडत असताना पन्नास ते साठच्या काळात अनेक कथाकारांनी ज्या उमेदीने कथालेखन केले त्यामुळे मराठी कथावाङ्मय कसे अनेक अंगांनी फुलून आले, हे गाडगीळांनी स्पष्ट केले. मानवी मनाचा मराठी कथेने घेतलेला वेध, ग्रामीण भाषेचे, बोलीचे वैभव पुरेशा कलात्मकतेने सहजगत्या व्यक्त करून सबंध गाव पुन:पुन्हा उभे करण्याचे व्यंकटेश माडगूळकरांचे सामर्थ्य, ग्रामीण कथेला अभिजातता देण्याची शंकर पाटलांची धडपड आणि मानवी जीवनाला व्यापून राहणारी अतिमानुष पातळीवरील एक वेगळी संगती आविष्कृत करणारी चिं. त्र्य. खानोलकरांची कथा, पुंडलिकांनी जाणीवपूर्वक केलेली कलाकुसर आणि जी. ए. कुलकर्णींनी जीवनाच्या उग्रगंभीर प्रवृत्तीचे घडविलेले दर्शन यामुळे मराठी वाङ्मयात कथेने वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण केले आहे, याची कबुली गाडगीळांनी

दिली. नैसर्गिक आणि सामाजिक वातावरणाची आणि त्याचप्रमाणे व्यक्तिचित्राची आणि घटनाची जीएंमधील विविधता कशी झपाटून टाकते यासंबंधीचे गाडगीळांचे विवेचन मार्मिक होते; परंतु त्याच्या पक्क्या बांधणीच्या कथानी नवकथेतील मुक्तीची कोंडी झाली आहे आणि जीएंना ग्रासणाऱ्या एका विशिष्ट प्रकारच्या मनोविकृतीने त्यांच्या प्रतिभेला आपली बटीक केली आहे. त्यामुळे जीएंसारख्या प्रतिभेचे मोठे लेणे लाभलेल्या कथाकाराने एका मनोगंडाचे गुलाम व्हावे, ही दुर्दैवी घटना आहे, या गाडगीळांच्या निदानाबद्दल भरपूर मतभेदास जागा आहे, असा चर्चेचा एक सूर दिसून आला.

## ग्रामीण वाङ्मयाची पीछेहाट

अलीकडे दलित आणि ग्रामीण वाङ्मयाचे (केवळ चर्चेपुरते का होईना) फड उभे करण्याचे जाणीवपूर्वक प्रयत्न चालू आहेत. ग्रामीण वाङ्मयाची चर्चा करण्यासाठी डॉ. आनंद यादव उपस्थित होते. त्यानी मराठी नवकथेला गाडगीळानी मनोविश्लेषणाची जी बैठक दिली ती ग्रामीण कथेत जाणीवपूर्वक राबविण्याचा प्रयत्न करणारा कथाकार म्हणून पाटलाचा उल्लेख केला. यादवांचा प्रयत्न मराठी ग्रामीण कथेतील कलावादी दृष्टीचा शोध घेण्याचा होता. त्यानी *माडगूळकर, मिरासदार, शंकर पाटील आणि बोराडे याच्या कथा*-वाङ्मयाचे मार्मिक दिग्दर्शन केले आणि अलीकडे लिहू लागलेल्या साऱ्या ग्रामीण कथाकाराचा उल्लेख केला. जी. ए. कुलकर्णी, खानोलकर यांच्या काही कथांना ग्रामीण म्हणून संबोधिले. ग्रामीण कथेचा वेगळेपणा त्यातून व्यक्त होणाऱ्या ग्रामीण सवेदनेवर ठरतो, ही त्यांची महत्त्वाची कसोटी. अलीकडच्या वृत्तपत्रानी सनसनाटी आणि फाजील विनोदाचे आविष्करण करणारे तथाकथित ग्रामीण साहित्य छापून ग्रामीण कथेचा घाट बिघडवून टाकला, हा त्याचा महत्त्वाचा आक्षेप. सौ. विजया सस्ते यानी आजचे ग्रामीण कथाकार आजच्या ग्रामीण जीवनापासून कसे दुरावले आहेत, यासंबधीचे घेतलेले आक्षेप महत्त्वाचे होते. त्या सर्वांचे निराकरण करता यावे, असे आजच्या ग्रामीण कथेचे स्वरूप दिसून येत नाही, हे लक्षात आले.

## दलित वाङ्मयासंबंधी मौलिक विवेचन

बारामतीच्या चर्चासत्रात सर्वांत महत्त्वाचे विवेचन झाले ते दलितकथेसंबंधी. त्याचे श्रेय प्रा. वसंत दावतराना दिले पाहिजे. त्यानी 'दलित वाङ्मय' कशाला म्हणावे याची नेमकी चौकट आखून दिली आणि दलित वाङ्मयाच्या पुरस्कर्त्यांनी यासंबंधाने *निर्माण केलेला सारा संभ्रम क्षणार्धात नाहीसा करून टाकला.* जे जे पीडित, शोषित ते सारे दलित हे लक्षात घेऊन दलितजीवनासंबंधी कथा ती दलित कथा असे समीकरण त्यानी माडले आणि त्या कसोटीवर दलित म्हटली जाणारी सारीच कथा दलित कशी नाही, हे दाखविले. जे थोडेसे ललित म्हणून शिल्लक राहते त्यालाही आपल्या भूमिकेचे पूर्णपणे भान नाही आणि कलात्मकतेच्या दृष्टीने त्यातले किती टिकेल, याचेही त्यानी दिग्दर्शन केले. दलित साहित्यात आजही माटघाना महत्त्व का? यासबंधी दावतराची निरीक्षणे महत्त्वाची होती. अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात आणि बाबुराव बागूल याच्या कथावाङ्मयाचे विश्लेषण करून दावतरानी त्यातील 'दलित' म्हणून असणाऱ्या वैशिष्टयाचे कच्चेपण उदाहरणानी सूचित केले. अण्णाभाऊ साठे याची कथा विषम असून निश्चित भूमिकेअभावी ती कृत्रिम आणि स्वप्नरंजनात्मक उतरली आहे. त्यातल्या त्यात दलित समाजाच्या समजुती आणि मूल्ये याची बरीचशी जाण शंकरराव खराताना दिसते. त्याचे शब्द, शब्दप्रयोग, वाक्प्रचार याच्या साहाय्याने त्याच्या भाषेतील अनोखी व लक्षवेधी चुणूक अनेक उदाहरणानी दावतरांनी स्पष्ट केली. मात्र त्याच्या कथेतील व्यक्तीच्या वाटयाला येणारे दु.ख आपापसातील स्पर्धा, भाऊबंदकी, भूक आणि वासना याच्यामधूनच येते. ते समाजरचना, सामाजिक भेदभाव, धार्मिक वेड यातून क्वचितच निर्माण होते. तसेच बहिष्कृततेपासून निर्माण झालेले घनगहिरे प्रसगचित्रण आणि व्यक्तित्वाची कुचंबणा दाखविणारी बोलकी चित्रेही त्यांच्या लेखनात फारच कमी आहेत. महार—माग माणूस आहे (दौंडी), म्हार पायरी सोडून पुढे चालली (वरात), चाभार म्हणून पाण्या-अभावी तडफडण्याची पाळी (पाणी) अशी स्थूलचित्रेही तुरळकच आहेत. *त्यामुळे त्यांच्या साहित्याच्या संकल्पनेमध्ये* 'दलित' म्हणून फारच अल्पस्थान आहे. कोणत्याही समाजाचे व त्यातील व्यक्तीचे जीवन समाजरचनेने बाधलेले असते हे खरे असले तरी ही समाज-रचना आणि दलिताच्या जीवनातील दारिद्र्य, भूक, वासना, स्पर्धा, संघर्ष यामध्ये या समाजामधून उद्‌भवलेल्या मूल्याचा संदर्भ आणि संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न खराताच्या कथेमध्ये कसा नाही, हे दावतरानी सोदाहरण स्पष्ट केले. त्या दृष्टीने बाबुराव बागुलाचे कथाविश्व आणखीनच दुबळे कसे आहे, हेही त्यानी दाखविले. बागुलाच्या 'जेव्हा मी जात चोरली' आणि 'दसऱ्याचा रेडा' या कथामधून समाजजीवन आणि व्यक्ती याचा संबंध चांगल्या रीतीने स्पष्ट होतो; पण अशा त्याच्या कथा अपवादात्मक असून त्याच्या बहुसंख्य कथा खालच्या किंवा भ्रष्ट अशा व्यक्तीच्या जीवनातील व्यक्तिनिष्ठ प्रसंगानी युक्त आहेत. या व्यक्ती ज्या जातीतून जन्मल्या त्या जातीतील भाषेचा, प्रतिमांचा बागुल उपयोग करीत नाहीत. त्याची भाषा पात्राच्या भावछटाशी सवाद निर्माण करू शकत नाही, त्यामुळे ती कृतक कशी वाटते हे दावतरानी असख्य उदाहरणे देऊन स्पष्ट केले.

दलित कथातील उदाहरणे देऊन, ज्या जीवनप्रसंगाना या कथातील व्यक्तीना तोड द्यावे लागते ते दलित नसते तर तोड द्यावे लागले नसते, अशी अपरिहार्यता दलित कथाकाराना निर्माण करता आली नाही. व्यक्तिगत हेवेदावे, दारिद्र्य, अज्ञान आणि समाजातील दुराव्याच्या बव्हशी काल्पनिक जाणीव यातून हे सारे निर्माण झाले असल्याने दलित वाङ्मय हा लक्षणीय लेखनविभाग ठरत नाही. त्यातील कथावाङ्मय तर अगदी तुरळक आणि तुटपुंजे आणि संपन्न, कलात्मक कथा तर अपवादात्मकच; असे भेदक निरीक्षण दावतरानी सादर केले.

दावतराच्या या विवेचनाने दलित वाङ्मयाच्या अनेक नकारात्मक वैशिष्टयाना अभ्यासपूर्ण आणि ठामपणे स्पर्श केल्याने नेहमीच्या आक्र-स्तळी चर्चेला शिबिरात पायबद बसला.

## सामाजिकता आणि कलात्मकता यातील वैर

दलित वाङ्मयाच्या चर्चेला वादविवादात्मक स्वरूप यऊ शकले नाही; परंतु 'मराठी कथेतील कलात्मकतेचा पुनर्विचार' या कमल देसाई याच्या निबंधाने उलटसुलट विचाराची वादळे खूपच प्रकटली.

मर्ढेकरांच्या कलाविचाराने मराठी वाङ्मय आणि समीक्षा बंदिस्त झाली आणि सामाजिक परिस्थितीचे आव्हान स्वीकारण्याची मराठी कथेची क्षमताच नष्ट झाली, असा कमल देसाईंच्या म्हणण्याचा मथितार्थ होता. तत्कालीन परिस्थितीचे आव्हान पेलण्यासाठी एखादी कलाकृती समर्थ नसेल तर ती कलात्मकता दुबळी ठरते; मग अशी कला खड्डयात गेली तरी चालेल, असे त्यांना वाटते. कमल देसाई यांच्या विचारातील सामाजिक बांधिलकीचे नवे भान कुठून आले असावे, अशी आपापसात कुजबूज होत राहिली; कारण त्यांच्या लेखनात ती कुठेही प्रतिबिंबित झालेली दिसली नव्हती! कलामूल्ये आणि जीवनमूल्ये याची मर्ढेकरानी केलेली फारकत यावर कमल देसाईंनी जोराचा आघात करून साहित्याचा समाजजीवनाशी अपरिहार्य संबंध आहे आणि समाजजीवनाची आजची मूल्ये अपरिहार्यतेने स्वीकारून लेखन केले पाहिजे, अशी त्यांची भूमिका होती. या भूमिकेवर अनेक आक्षेप निष्पन्न झाले. शेक्सपियर, कालिदासामध्ये आजच्या जीवनमूल्याचे कोणते आव्हान आहे ? मग त्याला मोठेपण का निर्माण होते ? अशासारख्या निरुत्तर करणाऱ्या प्रश्नाने चर्चा हेलकावे खात राहिली. गंगाधर गाडगीळानी जी. ए. कुलकर्ण्यांच्या कथेवर बोलताना या भूमिकेवर कमालीचा औपरोधिक हल्ला केला. कलासमीक्षेतील या यक्षप्रश्नाला सामोरे जाण्याऐवजी बगल देण्यात आली हे त्यावरून लक्षात आले. अशासारख्या प्रश्नाची चर्चेतून तड लागणे शक्य नाही, हे त्यावरून लक्षात आले.

### कुंडली मांडू नये !

अस्तित्ववाद आणि मराठी कथा, कथावाङ्मयप्रकारची नेमकी व्याख्या इत्यादी आणखी काही महत्त्वाचे प्रश्न या चर्चासत्रामध्ये चर्चिले गेले. त्यातील अस्तित्ववादाची चर्चा अगदी असमाधानकारक होती. समारोपाच्या भाषणात प्रा. दावतर यांनी कोणत्याही ललित लेखकाची वा साहित्यप्रकाराची समीक्षकाने कुंडली मांडण्याचा प्रयत्न-सुद्धा करू नये, असा महत्त्वपूर्ण इशारा दिला. गेल्या वीस वर्षांत मराठी कथा थंडावली म्हणून पुढील दहा वर्षांत तशीच राहील किंवा नवा कोणी समर्थ कथाकार जन्माला येणार नाही, अशा प्रकारची वाह्य भाकिते व्यक्तविण्यापासून समीक्षकाने दूर राहिले पाहिजे, हाच बोध त्यातून निघाला.

बारामतीच्या कॉलेजातील मराठीचे सहृदय प्राध्यापक डॉ. दयानंद पाटील आणि त्याचे सहकारी यांची अशा प्रकारच्या चर्चा घडवून आणण्याची तळमळ आणि त्यासाठी त्यांनी दाखविलेले अगत्य उल्लेखनीय होते. महाराष्ट्रातील असंख्य महविद्यालयानी बारामतीचे अनुकरण जरूर केले पाहिजे. □

---

श्यामचा संसार (कथा–६)

फिरोझ रानडे

# ब्रेन-ड्रेनच–पण वेगळ्या तऱ्हेचा

'असे डोके ठणकतेय, वाटते की अगदी दगडावर डोके आपटून घ्यावे,' डोके दुखणारी माणसे ज्या आवाजात बोलतात त्या आवाजात राधा बोलली.

राधाचे डोके दुखायला लागले की, ती नुसते दगडावर डोके आपटून घ्यावे असे फक्त म्हणूनच थाबत नसे, तर त्याप्रमाणे हालचाली पण करत असे. अशा वेळी श्यामला काय करावे ते सुचत नसे. आताही तसेच झाले.

त्यातून नुकतेच ते विश्वकर्मा हौसिंग सोसायटीतल्या सात-आठ इमारतींपैकी 'कृष्ण-कुंज' नावाच्या इमारतीत राहावयास आले होते. बाकी रहिवाशाचा फक्त चेहरा-मोहराच ओळखीचा झाला होता. साधारणपणे मराठी माणसांना एकमेकांची ओळख करून घेण्याची वा आहे ती जास्त वाढवण्याची फारशी उत्सुकता नसते. त्यातला एखादा जरी पंजाबी वा मद्रासी असेल तर ओळख व घरोबा वाढतो; पण दोघे मराठी म्हटल्यावर दोघेही 'बाण्या'चे असल्याने तोडओळख तोडओळखीवरच राहते.

श्यामच्या एका पंजाबी मित्राला मराठी माणसाच्या ह्या वृत्तीचे फार आश्चर्य वाटत असे. दोन घ्यावे, दोन द्यावे, आहे त्यात सर्वांनी मौज–मजा करावी, दोघानी एकमेकांचा पुरेपूर फायदा घ्यावा ही पंजाबी वृत्ती कोणीकडे व हा माणूस आपल्या ओळखीचा फायदा तर घेणार नाही ना, ह्या विचारात कायमचे वावरणारे मराठात्मा कोणीकडे. तो पंजाबी मित्र म्हणावयाचा, 'Maharashtra is very fine place to live, only trouble is that there are lot of Maharashtrians!' असो.

पण आता श्यामला मराठी माणसाच्या कोणत्याही वृत्तीची फिकीर नसून राधाच्या डोकेदुखीकरता योग्य असा डॉक्टर कोठून आणावा हाच प्रश्न होता.

तरी सोसायटीत डॉक्टरमंडळी बरीच असावीत असा श्यामचा अंदाज. एक तर प्रत्येक इमारतीच्या प्रवेशावरच नावाचे लाबलचक बोर्ड लावले होते व सर्व रहिवाशांना सर्व सहवाशांची नावं, दूरध्वनी-क्रमाक व पत्ता अशी माहिती दिलेली एक पुस्तिकापण दिली होती. त्यात बरेच डॉक्टर होते.

श्याम राहात होता त्या कृष्ण-कुंजातच दोन डॉक्टर्स होते. एक दुसऱ्या मजल्यावर व एक बाराव्या मजल्यावर. दुसऱ्या मजल्यावरच्या डॉक्टराचे नाव विशेष माहितीचे नसले तरी बाराव्या मजल्यावरच्या डॉक्टराचे नाव खूप वेळा वाचले व ऐकले आहे असे श्यामला दररोज सकाळ-संध्याकाळ प्रवेशावरचा बोर्ड वाचताना वाटत असे; पण कुठे ते मात्र काही त्याला आठवावयाचे नाही.

आता दुसऱ्या मजल्यावरच्या डॉक्टरांना बोलवावे का बाराव्या मजल्यावरच्या, असा प्रश्न श्यामला पडला; पण राधाला विचारल्याशिवाय काही करणे म्हणजे तिच्या

डोकेदुखीत भर टाकण्यासारखेच आहे हेही त्याला माहीत होते.

म्हणून तो राधाजवळ गेला व अगदी हलक्या आवाजात विचारू लागला, ‘ राधा, त्या दुसऱ्या मजल्यावरच्या डॉक्टरांना बोलावू का ?’

राधा दुखणारे डोके वर करत म्हणाली, ‘अहो, झालंय काय तुम्हाला ? दुसऱ्या मजल्यावरचा डॉक्टर काही कामाचा डॉक्टर नाही आहे.’ राधाच्या शब्दकोषात दोन तऱ्हेचे डॉक्टर्स होते. एक कामाचा व एक नावाचा. कामाचा डॉक्टर म्हणजे मेडिकल डॉक्टर व नावाचा डॉक्टर म्हणजे ‘ रामायण-कालीन कपडे धुलाई ’ वा ‘ महाभारतकालीन रथांचे प्रकार ’ असे वा आजच्या घडीला ज्यांचा फार काही उपयोग नाही अशा विषयावर प्रबंध लिहून डॉक्टरकी वा पीएचडी मिळवणारा डॉक्टर !

श्यामला नेहमी प्रश्न पडावयाचा की, असे नावाचे डॉक्टर्स काही वेगळी title का शोधत नाहीत ? म्हणजे माणसाला कसे नुसते नावावरून कामाचा का नावाचा हे झटकन कळले असते.

बरे झाले राधाला तरी दुसऱ्या मजल्यावरचे डॉक्टर फक्त नावाचे आहेत हे माहीत होते म्हणून. नाही तर श्याम त्यांचेकडे गेला असता व त्या नावाच्या डॉक्टरांनी त्याचा चागला ४५ मिनिटांचा क्लास घेतला असता व त्याचेच डोके दुखले असते !

‘ मग असं करू या का ? की बाराव्या मजल्यावरच्या डॉक्टरांना बोलावू का ? ’ श्याम.

‘ अहो, काय झालंय तुम्हाला ?’ राधाचा परत तोच प्रश्न ‘ जरा घड्याळाकडे तरी बघा ! ’

बायकांचे एक बरे असते डोके दुखत असो वा पोट दुखत असो, त्यांचा मनाचा तोल म्हणून कधी जात नाही. जसं एका मारवाड्याची गोष्ट सांगतात ना की, जेव्हा तो अगदी मरायला टेकला त्या वेळी त्याच्याजवळ त्याचे भाऊ, मुले, पुतणे, नातू, पणतू सगळे जमले. त्याने डोळे उघडून पाहिले, ही सगळी पुरुष मंडळी आपल्या जवळ उभी आहेत. ते पाहून तोही बोलू लागला सगळ्यांना वाटले की, म्हातारा सोनं–नाणं कोठे पुरून ठेवले आहे ते सांगतो आहे म्हणून ते सर्वजण कान देऊन ऐकू लागले. त्या मरायला टेकलेल्या मारवाड्याने विचारले, ‘ अरे, तुम्ही सर्वजण येथे आलात मग दुकानावर कोण आहे ? का दुकान बंद करून आलात ? आणि कोणी गिऱ्हाईक शेजारच्या दुकानात गेले तर ? काही झाले तरी वहिवाट मोडता कामा नये ! ’

आता बाराव्या मजल्यावरच्या डॉक्टरांचा व घड्याळाकडे पहाण्याचा काय संबंध ? पण श्यामचे एक तत्त्व होते ते म्हणजे राधा म्हणते त्याप्रमाणे करणे. तेव्हा राधाने त्याला घड्याळाकडे बघा सांगितल्यावर त्याने टकटक करणाऱ्या घड्याळाकडे पाहिले व भोळेपणाने म्हणाला, ‘ साडेदहा वाजले आहेत. ’

‘ मग आता ह्या वेळी ते घरी असतील का ? ’

‘ म्हणजे साडेदहा-अकरापर्यंत हे डॉक्टर-साहेब दवाखान्यात असतात ? आणि तरीही समाज म्हणतो की आज-कालच्या डॉक्टर्समध्ये इंटिग्रिटी राहिलेली नाही म्हणून. ’ श्यामला असे म्हणणाऱ्या समाजाचा खूप राग आला पण त्याने काही राधाच्या डोक्याचा प्रश्न सुटणार नव्हता. म्हणून त्याने तो राग तसाच दाबला.

राधाने मनातल्या मनात आपल्या दुखणाऱ्या डोक्याला हात लावला व म्हणाली, ‘ अहो, काही मराठी वर्तमानपत्रं वाचता की नाही ? हे बाराव्या मजल्यावरचे डॉक्टर कामाचे डॉक्टर असले तरी काम करत नाहीत. काम करत नाहीत म्हणजे डॉक्टरीचे काम करत नाहीत. ते पूर्वी मराठी नाटकातून काम करत असत, मग हिंदी सिनेमात कामे करू लागले व आता परत मराठी नाटकात काम करू कागले आहेत. परवाच नाही का त्यांच्या नव्या नाटकाचा ‘ शुभारंभा ’चा प्रयोग झाला ? ’

आता श्यामच्या डोक्यात, रंगभूमीवर नायक किंवा नायिका आल्यावर जसा लख्ख प्रकाश पडतो तसा प्रकाश पडला !

‘ तरीच मी मनाशी दररोज नाव फलक वाचताना म्हणत असे, की,गड्या हे नाव खूप वेळा ऐकले आहे–वाचले आहे पण कुठे ते काही लक्षात येत नसे. ’ श्याम आपल्याकडून फार मोठी चूक झाली अशा आवाजात बोलला.

‘ एवढ्या मोठ्या मराठी नटसम्राटाचे नाव तुम्हाला आपले कोठे तरी वाचल्यासारखे वा ऐकल्यासारखे वाटत होते काय ? काय म्हणावं तुम्हाला ? निदान हिन्दी सिनेमात काम करायला लागल्यापासून तरी तुम्हाला त्यांचे ‘ सम्राटपण ’ कळायला हवे होते. ’ आता राधा उठून बसली होती. ‘ त्यांचे हिन्दी सिनेमाचे शूटिंग जोरात चालू आहे म्हणून आज अगदी सकाळी ठाण्याला, थोड्या उशिरा सकाळी विलेपार्लेला, लवकर दुपारी दादरला, उशीरा दुपारी प्रभादेवीला व आता गिरगावात प्रयोग होणार आहे ! आता घरी कसे असतील ते ? ’

‘ हो, हो, नसणारच घरी. मी अगदी विसरलोच होतो बघ. ’

‘ असे विसरता कसे हो ? ’ राधा श्यामची कींव करत म्हणाली,‘दोन स्त्रियांच्या प्रेमाच्या कात्रीत सापडलेल्या एका प्रसिद्ध


तिसरी आवृत्ती संपत आली.

**हुकूमशहा सत्तेवर कसे येतात ?**

**राष्ट्रवादाची शुभशक्ती अशुभ केव्हा ठरते ?**

**या व अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी....**

# नाझी भस्मासुराचा उदयास्त

लेखक : वि. ग. कानिटकर

आवृत्ती : तिसरी ( सचित्र )

किंमत : रुपये पंचेचाळीस

**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

मराठी लेखकाच्या जीवनावरचे ते नाटक आहे. काम अतिशय अवघड आहे, पण काय बेफाम काम करतात डॉक्टरसाहेब ! '

' खरच असं कात्रीत सापडलेल्या माणसाचे कधीही कोणत्याही ' कात्रीत ' न सापडणाऱ्या माणसाने काम करणे ही फार अवघड गोष्ट आहे खरी. ' श्याम प्राजळपणे कबुली देत म्हणाला.

' मग आता नाटकाचा प्रयोग असताना घरी कसे असतील ते ? '

' नाही, नसणारच ते घरी ! ' श्याम मोठ्याने म्हणाला; पण मनाशी म्हणाला, आणि जरी अगदी घरी असले तरी ज्याला दोन बायकाच्या कात्रीत सापडणाऱ्या माणसाचे अवघड काम करावयाची सवय आहे त्याला आपल्या बायकोची प्रकृती पहायला का बोलवावयाचे ? एवढे मनाशी बोलून तो परत मोठ्याने म्हणाला, 'मग हे लोक नावापुढे डॉ. लावून आमच्यासारख्या सामान्य माणसाची डॉक्टर–भूल का करतात ? '

राधाकडे ह्या प्रश्नाचे उत्तर नव्हते, पण मग तिला एकदम आठवले की, तिचे डोके दुखते आहे. म्हणून ती ' आई ग ' करत बिछान्यावर पडली व कण्हू लागली.

राधा कण्हू लागली तसा श्याम हवालदिल होऊ लागला. त्याने लिहावयाच्या टेबलाच्या ड्रॉवरमधली नावा–पत्त्याची चोपडी काढली व त्या यादीत कोणी डॉक्टर आहे का ते तो पाहू लागला; त्यात डॉक्टरचे नाव सापडल्याबरोबर आनंदाने ओरडून त्याने विचारले , ' राधा, हे बघ आणखी एक डॉक्टर, बाईचे आहेत. बोलवायचे का त्याना ? '

' अहो, बाईचे नसेल वाईचे असेल.' राधा परत तोल न जाऊ देता बोलू लागली. ' दिल्लीची बाई लोकांना जळी स्थळी काष्ठी ...दिसते म्हणून छापण्यात वाईऐवजी बाई छापले गेले असेल ! '

' बरं वाई तर वाई, पण बोलावू का त्यांना ? '

' नको, हे डॉक्टर लोकाच्या डोळ्यावर उपचार करत नाहीत, तर त्यांच्या अंधश्रद्धेवर इलाज करण्याच्या मागे लागले आहेत. त्यांचा पल्ला अगदी पंढरपुरापासून तो थेट ऑस्ट्रेलियापर्यंत जातो. '

' आता काय करावं ह्या डॉक्टरांना ?' श्याम कातावून म्हणाला, ' चांगले पाच-पाच वर्षं मेडिकलचं शिक्षण घेतात. स्वतःचा व सरकारचा पैसा खर्च करतात. काही आपले अमेरिका, कॅनडात जातात. बरं जे हिंदुस्थानात रहातात ते तरी आपल्या वैद्यकीय ज्ञानाचा उपयोग करतात का ? नाव नको ! कोणी नाटके लिहितो, कोणी नाटके करतो, कोणी गाणे म्हणतो, कोणी सिनेमात काम करतो, कोणी पुस्तके लिहितो,तर कोणी चित्रे काढतो. कोणी लोक पंढरपूरला का जातात, क्रिकेट का खेळतात ह्यावरच वाद घालतो. एवच, हे डॉक्टरलोक डॉक्टरपणा सोडून बाकी सर्व काही करतात, अरे, काय हे ? '

खरं म्हणजे हा प्रश्न श्यामने राधाला असा काही विचारला नव्हता, अगदी जनरल होता. पण श्यामला पडणाऱ्या सर्व प्रश्नाना उत्तरे देण्याची जबाबदारी आपली आहे असे राधा मानत असे

म्हणून ती उठून बसत म्हणाली, ' अहो, ह्या डॉक्टराबद्दलच काय, पण सगळ्याच प्रोफेशन्सबद्दलच्या तुमच्या कल्पना आता फार जुन्या झाल्या आहेत. बॅरिस्टरांनी बॅरिस्टरी केली, प्रोफेसरांनी प्रोफेसरी केली, डॉक्टरानी डॉक्टरी केली तर त्यात विशेष काय आहे ? ज्या विषयाचा आपला अभ्यास आहे तो सोडून दुसऱ्या विषयात जो काही करतो तो खरा ! चला खूप उशीर झाला, जेवून घेऊ या ! '

श्यामला एवढाच आनंद होता की, ह्या नुसत्या कामाच्या डॉक्टरांच्या नावानेच राधाचे डोके दुखायचे थांबले होते. तो मनाशी म्हणाला, हेही रगड झाले म्हणायचे !

□


**SOME NEW TITLES RECEIVED**

1. **My Truth**—( Nearest thing to her autobiography )
   Emmanuel Pouchpadass — Rs. 100/—
2. **Life Goes to War**—Illustrated — „ 70/—
3. **People of the Lake**—( Origin and Future of Man)
   Richard Loaky
4. **Be the Person You Were Meant to be**— (Self Improvement—Jorry Greenwald
5. **On a Clear Day You Can See General Motors**—
   ( Severe indictment of the automobile industry by its own top-flight executive De Laurean )

¤ Beat the horrible inflation in two ways.

1. Subscribe for many years. 2. Reading habit will keep you away from hotels, holiday resorts, picture houses, clubs, and the gas guzzling vehicles !

**The Phoenix Library**
Opp. Sadashiv Post, PUNE 411 030.

# पुस्तके

## एक सर्वमंगल क्षिप्रा

**आदरणीय हरिभाऊ मोटे यांसी,**
**सा. न. वि. वि.**

आपल्यासारख्या कोणत्याही ख्यातनाम व्यक्तीला, विशेषतः ख्यातनाम लेखक-प्रकाशकाला पत्र लिहायचं म्हटलं की माझ्यासारख्याला जरा अवघडल्यासारखं होतं; पण आपल्याला पत्र लिहिताना ही भावना, अवघडलेपण जवळजवळ नाहीसं झालंय. कारण तुम्ही पत्रांचे लोभी आहात. त्यामुळं माझं वेडंवाकडं पत्र तुम्ही सहज स्वीकाराल याबद्दल संदेह नाही.

पत्रलेखनाचं कारण सुरुवातीलाच नमूद करायचा एक संकेत असतो. मी हे पत्र तुम्हाला लिहितोय ते तुमचं 'एक सर्वमंगल क्षिप्रा' हे आत्मचरित्रात्मक पुस्तक वाचल्यावर मला काय वाटलं हे कळवावं ह्या उद्देशानं. 'एक सर्वमंगल क्षिप्रा'ला तुम्ही स्वतःच 'माझ्या आयुष्यातील काही छटा' असं म्हटलंय हे बरं झालं. 'तुमचं हे सगळं आत्मचरित्र नाही' असा आक्षेप कुणी घेण्याचं त्यामुळं कारण उरत नाही. सुरुवातीलाच सांगून टाकतो, १९१५ ते १९४५ या कालावधीतल्या या छटा न्याहाळल्या अन् मार्च १९८१ पर्यंत आपल्या आत्मपर कथेचा भाग दोन पूर्ण करण्याचे जे आश्वासन आपण 'मनोगत' मध्ये दिले आहे त्या भागाबद्दल खरोखरच उत्कंठा लागली आहे.

ही उत्कंठा लागण्याचं कारण काय असं तुम्ही विचाराल. आत्मचरित्र किंवा आत्मचरित्रसदृश लिखाण मुळातच उत्कंठा निर्माण करणारं असतं; पण तुमच्या 'आत्मपर कथे'बाबत अशी उत्कंठा लागण्याची आणखीही काही कारणं आहेत. त्यातलं एक महत्त्वाचं कारण म्हणजे तुमची ही आत्मपर कथा काही प्रमाणात एका विशिष्ट कालखंडातल्या वाङ्मयीन हालचालींचीही कथा आहे. तुम्ही स्वतःच 'साहित्य क्षेत्राच्या कुंपणाजवळ जाऊन या क्षेत्रात डोकावून पाहण्याचा जो प्रयत्न केला तो प्रयत्न न्याहाळणं मोठी समाधान देणारी गोष्ट आहे. 'प्रतिभे'चा पत्रव्यवहार आणि (प्रतिभेच्या) लेखकांच्या भेटी यांनी आपल्याला समृद्ध केल्याचं तुम्ही आवर्जून नमूद केलंय. तुम्ही साहित्य आणि साहित्यिक यामुळे कसकसे समृद्ध होत गेलात याबद्दल एक कुतूहल, एक औत्सुक्य असणं स्वाभाविक नव्हे काय? आणि हरिभाऊ, इथंच लिहुन टाकायला हरकत दिसत नाही. तुम्ही साहित्य क्षेत्राच्या कुंपणाजवळ गेलात ते डोकावून पाहण्यासाठी, स्वतःला समृद्ध करण्यासाठी; पण मराठी साहित्याच्या दृष्टीनं पाहिलं तर तुमचा हा उद्योग एकूणात मराठी साहित्याला आणि मराठी साहित्यिकांना समृद्ध करीत होता, करीत राहिला हे समजावून घेणं किती आनंदाचं आहे! आपल्या 'प्रतिभे'नं साहित्यिक कंपूशाहीला धक्का दिला हे किती महत्त्वाचं आहे. अहो हरिभाऊ, लेखक आणि त्याची कलाकृती यांबद्दल अपार आस्था असल्यानंच आपण प्रकृतीच्या तक्रारींना दाद न देता लेखकाच्या (जसे वा. ना. देशपांडे) वा त्याच्या कलाकृतीला (जसे 'ब्रह्मकुमारी'ला) न्याय देणाऱ्या मंडळींच्या गावी आला-गेलात ना? लेखक आणि त्याची निर्मिती यांसाठी खस्ता खाणं हा जणु तुमचा मनोधर्मच. या मनोधर्मानंच तुम्हाला विभावरीच्या टीकाकारांचे कसलेले घाव झेलण्याचं बळ दिलं काय? पुन्हा 'विभावरी'वरील टीकेची झिंग आपल्याला आली होती, असं तुम्ही सहज कबूल करता. आर्थिकदृष्ट्या कालमडलेलं 'प्रतिभा' हाती घेऊन तुम्ही उभं केलं; नुसतं उभं केलं असं नव्हे तर 'प्रतिमा' न वाचणं म्हणजे काळाच्या मागं राहणं असा 'प्रतिभे'चा दरारा निर्माण केलात आणि तरीसुद्धा तुम्ही लिहिता, 'परवा वऱ्हाडाकडून आलो; शिक्षण, अनुभव, अभ्यास कसलाच नाही—अशा मला हे साहित्यिक, विद्वान, अनेक नवे-जुने लेखक भेटायला येतात, माझ्या विनंतीनुसार लिहितातही! याचा अर्थ काय? कसे घडते हे? अशा काहीशा ढोंगी प्रश्नांनी त्या वेळी माझ्यात असलेली उथळ अहंता चांगलीच सुखावे.' (पृ. १२५) तुमचे हे 'झिंग येणं', 'उथळ अहंता' हे शब्दप्रयोग वाचले (आणखीही दोन-चार ठिकाणी ते आले आहेतच) की तुमच्या प्रांजल स्वभावाची खरोखर गंमत वाटते. (शिवाय लेखक-प्रकाशकाला असा प्रांजलपणा जरा तरी शोभतो का?) हरिभाऊ, कै. श्री. ना. बनहट्टींसारख्या साक्षेपी माणसानं आपल्या संपादनकौशल्याचं कौतुक करताना काय म्हटलंय, ते आम्हाला महत्त्वाचं वाटतं. बनहट्टी काही अकारण स्तुती करणारे नव्हते ना? 'महाराष्ट्रातील सहृदय व विचारशील अशा वर्गाचे लक्ष वेधून घेईल असा मजकूर मिळविण्यामध्ये आपल्याइतके कौशल्य संपादन केलेला संपादक महाराष्ट्रात विरळाच आढळेल!' (पृ. १३०) हे तुम्हाला उद्देशून बनहट्टींनी १९३९ साली जे म्हटलंय, ते अजूनही खरं आहे असा आमचा समज आहे. कारण बनहट्टींनीच पुढं म्हटल्याप्रमाणं हे 'कौशल्य संपादन केलेले नसून आपल्या अंगी उपजत आहे' हेच खरं.

तर मुख्य मुद्दा असा की, साहित्यिक हालचालींच्या तपशिलानं भरलेली तुमची ही आत्मपर कथा भावी वाङ्मयेतिहास-लेखकांना केवळ संदर्भग्रंथ म्हणूनच नव्हे, तर एक चांगले source book म्हणूनही उपयुक्त ठरणारी आहे. साहित्यिक चळवळीत भाग घेतलेल्या आपल्यापूर्वीच्या व नंतरच्या लेखक—प्रकाशकांनी अशा आत्मपर कथा

लिहिल्या तर आधुनिक मराठी वाङ्मयेतिहासाच्या यथार्थ लेखनाला त्या वरदान ठरतील. तुमची ही आत्मकथा म्हणजे एका *वाङ्मयीन कालखंडाच्या चरित्राची टिपणेच* वाटतात मला.

हरिभाऊ सारे मराठी वाचक बेहद्द खूष आहेत ते तुमच्या पत्रसंग्रहाच्या छंदावर. छंद म्हटला की माझ्यासारख्या सामान्य माणसाला पोस्टाची तिकिटे जमविण्याचा छंद तेवढा आठवतो; पण या तिकिटाच्या आश्रयाने जो मजकूर येतो तो सामाजिक व सांस्कृकि मोलाचा आहे, हे आम्हा मराठी रसिकाच्या सर्वप्रथम लक्षात आणून दिलेत ते तुम्हीच. हे तुमचं पत्रसंग्रहाचं वेड 'प्रतिभा' पूर्व काळापासूनचं आहे हे उघडच आहे. मात्र तमाम मराठी रसिकाना ते कळल ते 'प्रतिभे'त 'शारदेचा विश्रब्ध विहार' या मथळ्याखाली १९३५ साली काही वैशिष्ट्य असलेली जुनी–नवी पत्रे प्रसिद्ध होत' (पृ. १२७) त्यामुळेच. तुम्ही किती ठिकाणाहून आणि किती प्रकारची पत्रं जमवली आहेत याची माहिती ऐकणं हाही एक चागला अनुभवच असतो. तुमच्या 'प्रकाशन-प्रतिभा', 'विश्रब्ध शारदा'बद्दल इथं लिहीत नाही; पण बेडेकर–वा. ना. देशपांडे यांच्यातला 'ब्रह्मकुमारी' नाटकावरचा पत्रव्यवहार त्या दोघाकडून मागून घ्यावा नि जतन करून ठेवावा हृ त्या वेळी तुम्हाला सुचल, हे महत्त्वाच. असच किंता तरी व्यक्तीच्या पत्रव्यवहाराबाबत तुम्हाला सुचत गेलं. तात्यासाहेब कोल्हटकराचा दोन पाती पत्रसग्रह जाळला गेला यामुळ तुम्ही हळहळला (पृ. १५७) ही गाष्ट नुसतीच खरी वाटत नाही, तर वाचताना आमच्या मनाला दैन्य येत. वा. ना. देशपांडे याचा प्रतिभेच्या सदर्भातला पत्रव्यवहार तुम्ही क्रमान दिलात. साहित्यिक–वाद कसे रगवायचेहे वा. ना. देशपांडे याना छानच आकळल होत, हे त्यातून कळत; पण खाडेकर याचा पत्रव्यवहार वाचल्यावर माझ्यासारखे त्याच्या साहित्याच सहृदय वाचक काही काळ केवळ स्तब्ध होतात, अवाक होतात. मग सावरल्यावर लक्षात येत, माठमाठे लेखक होही माणसच असतात आणि ती इतर माणसासारखीच वागणार! (इथच मला वि. स. खाडेकराचा 'आत्मचरित्रे' हा लघुनिबध आठवून जातोय.)

पण हरिभाऊ, खरं सागतो, पत्रातून प्रकट होणारी ही उणी–दुणी वाचायला खुसखुशीत असली तरी त्यात कुणी फारसं रमत नाही. (त्यामुळेच तुमच्या संग्रही असलेल्या अशा कित्येक पत्राना तुम्ही अजून वाचा फोडलेली नसणार) तुमच्या या पत्रप्रपंचामुळे वाङ्मयीन दृष्टिकोण तयार होण्यास मदत होते, हे महत्त्वाचे. आता तुम्ही विचाराल, हे वाङ्मयीन दृष्टिकोण वगैरे काय 'फ्याड' काढलेत ?पण उदाहरण देऊनच सागतो. 'तारेचे असतुष्ट स्पिरिटच मला सारखे जाणवते. पुन्हा पुन्हा माझ्या लिहिण्यात ती उमटल्याखेरीज राहणार नाही,' हे बेडेकरांच्या पत्रातले वाक्य मला महत्त्वाचे वाटते. या वाक्याचे सूत्र धरून त्यांच्या 'रणागण' या भावकथेकडे माझ्यासारख्या वाचकाला पुन्हा वळता येईच. (भावकथा हा या कृतीच्या संदर्भात वापरलेला शब्दप्रयोग आपलाच. हा शब्दप्रयोग 'रणागण' ही लघुकादंबरी की दीर्घकथा या वादाचे फोलपट करून टाकतो. तरी हरिभाऊ, तुम्ही म्हणता की 'मी समीक्षक नाही' म्हणून! असो.)

खरोखरच पत्रव्यवहार जतन करण्याचे मराठी समाजाला कधी उमगेल कोण जाणे. हरिभाऊ, तुमच्यारख्या पत्रसंग्रहकामुळे ते आताशा थोडे–फार कळू लागले आहेत. महाराष्ट्र–संस्कृतीवर तुमचे ऋण मोठे आहे.

पत्रसग्रहाची गोष्ट बाजूला ठेवून बेडेकर व त्याच्या 'रणागण'कडे पुन्हा वळू. 'रणागण'च्या लेखनापूर्वी 'बेडेकर यांच्या मन:स्थितीचा पारा चागला धगधगता' कसा होता हे तुम्ही तपशिलानं सागितलत. साहित्यकृतीच्या निर्मितिप्रक्रियेबद्दल कुतूहल असणाऱ्याना कदाचित यातून काही मिळेलही. 'रणागण'च्या मजकुरातील काही पाने बेडकराना न विचारताच तुम्ही गाळल्याचे सागता. ही पाने तुम्ही किंवा बेडेकरानी कुठ जपून ठेवली आहेत का? लेखनकृतीची हस्तलिखिते जपून ठेवायची पद्धत आपल्याकडे नाही. अशी म्युझियम्स परदेशात, तिथल्या विद्यापीठात असतात अस ऐकिवात आहे. माग मला मुबईला असताना युसिसच्या ग्रथालयात 'Write and Rewrite' नावाचं एक पुस्तक पाहायला मिळालं होत. त्यात लेखकानं लिहिलेला मूळ मजकूर एका पानावर अन् त्यानच परिष्कृत केलेला मजकूर समोरच्या पानावर असं छापलं होतं. (आज ते पुस्तक त्या ग्रंथालयात उपलब्ध नाही.) असं कुतूहल आम्हा मराठी रसिकाना दिसत नाही. त्यामुळे लेखकाची हस्तलिखितं कुणासाठी जपून ठेवायची ? असो.

'रणागण'च्या छपाईबाबतचे बेडेकराचे आपल्याला आलेले पत्र फार बोलके आहे. त्या काळात इतर लेखक आपल्या स्वत च्या कृतीबद्दल इतकी जाणीव दाखवीत होते का ? तुम्ही त्या काळाचे साक्षी म्हणून विचारतोय. या पत्रातली 'By the way या foreign (वाक्) प्रचाराबाबत त्या त्या पानावर खाली टीपा देण्याची गरज आहे काय ?' ही बेडेकराची पृच्छा केवळ गंमतीची वाटत नाही. (विशेषत: पु. शि. रेगे याच्या 'रेणु' या कादंबरिकेतल्या अशा टीपा आठवल्यावर तर मुळीच नाही.) बेडेकराना याद्वारे काही गभीरपणे म्हणायचे होते असे दिसते.

जाता जाता एक गोष्ट सागायला हवी. 'रणागण' हे पुस्तक वीस वर्षे तरी काळाआधी जन्माला आले असावे. म्हणून त्याचे मूल्यमापन एका पिढीनंतरच झाले!' (पृ. १८७) हा तुमचा 'रणागण'वरचा अभिप्राय मोठा मार्मिक आहे. बहुतांश वेळा अशा कलाकृती काळाच्या आधीच जन्माला येतात. अभिरुची घडविण्याचे कार्य त्या करतात. तेव्हा 'रणागण' ला काळाआधीच जन्माला घालून मराठी वाचकाची अभिरुची घडविण्याचा यत्न केल्याबद्दल बेडेकरांना लेखक म्हणून आणि तुम्हाला प्रकाशक म्हणून फार मोठे श्रेय द्यायला हवे.

हरिभाऊ, 'एक सर्वमगल क्षिप्रा' बाबत लिहिता लिहिता मी थेट 'रणांगणा'वर आलो. आता परत तुमच्या बालेकिल्ल्यापाशी येऊन तुमच्यापाशी सवाद साधायचाय. बालेकिल्ला म्हणज तुमचा प्रकाशनव्यवशाय हो! मला आणि माझ्या मताप्रमाणे जवळजवळ सगळ्या मराठी रसिकाना असंच वाटतय की, प्रकाशन हा तुमचा मनोधर्म आहे म्हणून. तुमचा स्वत:चाही आमच्या या म्हणण्याला दुजोरा आहेस दिसतय. तुम्ही लिहिता, 'एखादे नवे पुस्तक, नवे हस्त-

लिखित माझ्या हाती लागले व ते मला आवडले की त्यासंबंधी मी माझ्या परिसरात खूप बोले व इतरांनाही त्यात सहभागी करून घेई याने माझा आनंद दुणावे व अहंताही किंचितशी सुखावे. अशी देवाण–घेवाण व त्याचा आनंद हीच नकळतपणे माझ्या प्रकाशनव्यवसायाची प्रेरणा ठरली. या कारणाने व्यवसायातील व्यवहार, संयम, जागरूकता या साऱ्या गोष्टी बाजूला सारल्या गेल्या.' (पृ. १९७) प्रकाशनातला व्यवहार तुम्हाला जमला नाही याचे तुम्हाला फारसे दुःख दिसत नाही, (इतरांना नसणारच) याचेही कारण व्यवसाय या संज्ञेचा आजचा अर्थ अजून तुमच्या डोक्यात नाही हेच एक (मेव) आहे. 'प्रकाशनासाठी घ्यावयाच्या नव्या पुस्तकाची निवड स्वत:च्या आवडीनुसारच करावयाची. बाजारात ते किती खपेल याच्याशी त्याचा संबंध जोडावयाचा नाही' (पृ. २००) ही आपली प्रकाशनविषयक 'योजना'. अर्थातच ही योजना म्हणजे आपण स्वत: म्हणता त्याप्रमाणे 'एक मानसिक हौस व चैनच' (पृ. २०४) होय. ही हौस–चैन उपभोगता तुम्हास अनेक प्रकारे भोगही भोगावे लागले. 'मराठी पुस्तकाचा वाचक व खप' या विषयावर याच आत्मकथेत तुम्ही विस्ताराने लिहिले आहेच. (इतके विस्ताराने की आपण आत्मकथा वाचत आहोत याचा विसरच पडावा.) प्रकाशन व्यवसायावरचे आपले विचार केवळ चिंतनातूनच नव्हे, तर अनुभवातूनही प्रकट झालेले असल्याने त्याला एक मोल आहे, हेही खरंय.

प्रकाशन व्यवसायात अर्थवैभवापेक्षाही साहित्यवैभवातच तुम्ही दंग होता. लक्ष्मीमंदिराच्या पायऱ्या चढण्याऐवजी सरस्वतीच्या मंदिराकडे चाललेल्या दिंड्यांमध्ये तुम्ही मनोभावे सामील झालात. तुम्ही खरे तर वऱ्हाडाकडले लक्ष्मीपुत्र. लहानपणापासून लक्ष्मीचा वावर तुमच्या आसपास. असं असूनही तुम्ही सरस्वतीच्या दरबारात आलात. नुसते आलात असं नव्हे तर तिचे एक महत्त्वाचे मानकरी होऊन बसलात. ही गोष्ट सहजासहजी जमणारी नसते. त्यासाठी 'स्व'मन अनुकूल असावं लागतं. म्हणून तर मी अगोदरच म्हटलय की प्रकाशन हा तुमचा मनोधर्म आहे म्हणून.

तुमचा हा मनोधर्म तुम्ही तुमच्या आसपासच्या लेखकांपर्यंत पोहोचवलेला दिसतो. त्यामुळंच 'रामशास्त्री'बाण्याचे वा. ना देशपांडे किंवा विश्राम बेडेकर यांसारख्या तुमच्या सुहृदांप्रमाणेच वा. म. जोशीसारख्या ख्यातनाम लेखकानीही तुम्ही देऊ केलेल मानधन नाकारलं. तुम्ही (प्रकाशक असूनही) घसघशीत मानधन देऊ करीत होता आणि ही सारी मंडळी (लेखक असूनही) ते नाकारीत होती. सद्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, विशेषत: मानधनादी गोष्टींवरून लेखक–प्रकाशक वर्तमानपत्री चव्हाटयावर येण्याच्या या काळात आपले आणि आपल्या लेखकाचे हे वर्तन खरोखर कल्पित कथासारखे वाटते. वा. म. जोशीसारख्या लेखकाला त्या काळात आठशे रुपये देऊन तुम्ही लेखकाची यथोचित बूज प्रकाशकाने राखण्याचा आदर्श घालून देत होता आणि दुसऱ्या बाजूनं प्रकाशन व्यवसायावरील ('व्यवसाय' ही संज्ञा इथं जरा गौरवानंच घ्यायची) आपली निष्ठा पाहून वामन मल्हारासारखे लेखक आपणाशी स्नेहभावानं, आदरभावनं वागत होते. हरिभाऊ, तुमच्याबद्दल अन् तुमच्या या प्रकाशनव्यवहाराबद्दल लिहावे तेवढे थोडेच होईल.

चित्रपटव्यवसायात तुम्ही यापेक्षा वेगळे वागला नाहीत, पण प्रकाशन व्यवसायापेक्षा हा व्यवसाय फारच झंझावाती, पण याही व्यवसायात तुम्ही तुमची 'बिरुदावली' जपत राहिलात. स्वाभाविकच शोकांतिकेच्या नायकाप्रमाणे तुमच्या पदरी घटनाचे आकलन, अभिज्ञान तेवढे पडले. त्यातून बाहेर पडण्याचा मार्ग मात्र नव्हता. आपल्या चित्रपटाच्या व्यवसायाबद्दलच्या गोष्टी वाचताना आमच्या मनासमोर अत्रे–मोटे संबंधाचे एक 'वि–' चित्र उभे राहते. मुळात ही दोन भिन्न भिन्न प्रकृतीची माणसं एकत्र आलीच कशी ? त्यानी एकमेकाना निभावून घेतलं कसं ? असे प्रश्न मनाशी धरून वाचत वाचत पुढं यायचं. या वाचनातून गवसतं ते अत्रे याचे बेदरकार, अतिउत्साही, भावी परिणामाची क्षिती न बाळगता उडी घेणारे व्यक्तिमत्त्व आणि त्याला विरोधचित्र म्हणून येणारं तुमचं हिकमती पण संयत, शांत स्वभावाचं व्यक्तिमत्त्व. हरिभाऊ 'सर्वमंगल क्षिप्रा'च्या पहिल्या भागातला पण सगळ्यात लक्षणीय मजकूर वाटतो तो अत्रे–मोटे संबंधाचा. अत्रे तसे सगळ्याना माहिती असल्यामुळं आणि तुम्ही तसे सगळ्यांना बरेचसे अपरिचित असल्यानं प्रकाशन व्यवसाय व चित्रपट व्यवसायातल्या तुमच्या आयुष्याचं वर्णन जर मला कुणी एका वाक्यात करायला सांगितलं ना, तर मी म्हणेन 'हे दिवस म्हणजे हरिभाऊंनी उपभोगलेले अन् भोगलेलेही दिवस होत !'

कृष्णाबाईंशी झालेला तुमचा परिचय हा आमच्या पिढीचा कुतूहलाचा विषय. खरं सांगू, तुमच्या पिढीतले सर्वच प्रेमविवाह हे आमच्या पिढीतल्या तरुणाचे कुतूहलविषय होत. याबाबत जुन्या वृत्तपत्रांतून, नियतकालिकातून किंवा कुणाच्या चरित्रात्मचरित्रातून कुठं काही आढळलं ना, तर आमची पिढी अगदी चवीनं वाचते. आमच्या पिढीचे हे वर्तन असं का आणि हे योग्य की अयोग्य, याची चर्चा इथं नकोच. तुम्हालाही ती नकोच असणार म्हणा; पण मुख्य म्हणजे तुमच्या आत्मचरित्रातला हा भाग अशा 'चवीनं' (अवतरण हेतुत:) वाचणाऱ्यांची फारच निराशा करतो ही निराशा तुमच्या लेखणीतल्या संयमामुळे नाही झाली, तर एकूण तुमच्या व्यक्तित्वालाच चिकटलेल्या संयमामुळे झालीय. अहो, काय सांगायचं हरिभाऊ तुम्हाला ! काही आत्मचरित्रं आम्ही वाचली ती केवळ लेखकानं आपल्या प्रेमप्रकरा (णां)चं केलेलं कादंबरीमय वर्णन लक्षात घेऊनच. ... असो. फार लिहीत नाही. कारण हे सारं तुम्हाला न रुचणारं, न आवडणारं आणि मुख्य म्हणजे न मानवणारं आहे,

हरिभाऊ, तुमच्या या आत्मपर कथेतल्या किती तरी गोष्टी मनात रेंगाळत राहतात. (काही गोष्टी त्रोटक लिहिल्यात तरीही रेंगाळतातच.) उदाहरणार्थ घर बदलण्याबाबतचं तुमचं तत्त्वज्ञान (पृ.२७६), उज्जयनीची ती गुरुकुलसदृश्य शाळा, काश्मीरमध्ये तुमचा आणि लालाजीचा झालेला संवाद इत्यादी, इत्यादी.

आता हरिभाऊ, तुमच्या पुस्तकाबाबत रूढ पद्धतीनं परीक्षणवजा काहीबाही. पहिली आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे आत्मचरित्राच्या रूढ वाङ्मय प्रकाराला तुम्ही या पुस्तकाद्वारे चांगलाच धक्का दिलाय खरंतर

आत्मचरित्रलेखक आजपर्यंत तरी त्याच्या संग्रही असलेल्या पत्राचा – त्यातील निवडक पत्राचा–त्याला हवा तसा म्हणजे बहुतांश वेळा अनुकूल असा वापर करीत आलेला आहे. खुशीपत्रं, इष्टपत्रं याचा भरघोस वापर ही आमच्या आत्मचरित्राच्या नायकाला मोहात टाकणारी गोष्ट. अर्थातच ही आत्मचरित्रं आत्मचित्रं न राहता आत्मसमर्थन होऊ लागतात. तुम्ही या रूढीला काही प्रमाणात बाधा आणलीत. पत्रव्यवहाराचा संग्रह ही आत्मचरित्राची पूर्वतयारी न मानता ते आत्मचरित्राचं एक महत्त्वाचं अंगच तुम्ही केलंत. यामुळं आत्मचरित्रात आग्रह धरल्या जाणाऱ्या सत्याच्या तुम्ही फार जवळ गेलात. अर्थात या प्रकारात तुमचे मित्र म्हणतात त्याप्रमाणं शैलीची विषमता वगैरे आली आहे हेही खरं; पण आत्मचरित्राकडे कलाकृती म्हणून पहावं की एक 'डॉक्युमेंट' म्हणून हा चर्चेचा विषय होईल. आत्मचरित्र निर्भेळ कलाकृती होऊ शकते काय? तुमच्या या 'एक सर्वमंगल क्षिप्रा' मुळं ह्या प्रश्नाची चर्चा, सांगोपाग चर्चा व्हावी असं मला मनापासून वाटतं.

तुमच्या या आत्मपर प्रथेत पुनरुक्तीचा चागलाच दोप शिरलाय. प्रसंगोपात्त पुनरुक्ती येणार हे उघडच आहे; पण हरिभाऊ, तपशिलांच्या नोंदीची पुनरुक्ती तुम्ही का हो टाळली नाहीत? उदाहरणार्थ, 'प्रगति' व शेजवलकरांसंबंधी विस्तृत मजकूर आल्यावर पुन्हा नंतर (पृ. २०८ वर) त्याबद्दल तशाच प्रकारचा मजकूर कशासाठी? किंवा 'ब्रह्मकुमारी' चा पहिला प्रयोग १५ जून १९३३ रोजी झाला ह्या नोंदीची आवृत्ती का? (पृ. ११२ आणि २१५). बेडेकरांच्या शिष्यवृत्ती घेऊन परदेशगमनाबाबतचा मजकूरही असाच आवृत्त झालाय. हरीभाऊ, मजकुराची, विशेषतः तपशिलाची आवृत्ती झाल्याने रसहानी होते म्हणून हे सारं लिहीतोय. राग नसावा. दुसऱ्या भागात असं नसेलही.

आणखी एक गोष्ट. अर्थात या गोष्टीवर तुमचं नियंत्रण नव्हतं. ती म्हणजे मुद्रितशोधन काहीसे असमाधानकारक आहे. अहो, एक-दोन ठिकाणी तर मुद्राराक्षसाने चागलाच विनोद केलाय. उदाहरणार्थ '...कोल्हटकर याच्या दोन पात्रात (पत्रात हवं होतं) 'हिराबाई पेडणेकर' यांच्या त्या वेळच्या हालचालींसंबंधीचा...' (पृ. १५३)

पण हरिभाऊ हे आवृत्तीचे वा मुद्रित(अ)शोधनाचे किरकोळ दोष सोडा. तुमचं पुस्तक मला त्यातल्या सर्व दोषांसह आवडलंय. 'प्रेमळ सज्जनांचा अखंड झरा' तुमच्याभोवती नेहमी वाहतो ना, त्याचाही प्रत्यय या पुस्तकातून येतोच. तुमच्या प्रकाशनाचे बोधचिन्ह म्हणून तुम्ही 'ह' हा वर्ण वापरता. हा वर्ण म्हणजे महाप्राण. मग मी असं म्हणेन, हरिभाऊ मोटे म्हणजे मराठी प्रकाशन व्यवसायातला महाप्राण! तुम्हाला ही स्तुती आवडेल का?

असो. बघता बघता खूपच लिहिलंय. एवढ्या मोठ्या व्यक्तीला इतकं मोठं पत्र मी कसं लिहिलं याचं माझं मलाच आश्चर्य वाटतं. तुमची क्षिप्रा तुम्हाला नि तुमच्या साऱ्या सुहृदांना 'सर्वमंगल'कारक ठरो हीच सरस्वतीचरणी प्रार्थना!

आपला

दत्तात्रय पुंडे

'एक सर्वमंगल क्षिप्रा'
लेखक—हरी विष्णू मोटे
ह. वि. मोटे प्रकाशन, मुंबई
पृष्ठे—२८३, मूल्य—५० रुपये.

---

## दादुमियांच्या डायरीतील काही पाने : पृष्ठ ११ वरून

आदोलन आता फार झाले, अति लांबले, सरकारी फॉर्म्युला ठीक आहे व तरुण डॉक्टरानी तो आता स्वीकारावा असे या ६५ ऑनररी डॉक्टराचे म्हणणे आहे. बाकीच्या ४७ जणाचे मत होते, त्यांनी विद्यार्थ्यांना कमसे कम २४ तास द्यावे व मगच पाठिंबा काढून घ्यावा, असे न करणे तरुण डॉक्टरांना तोंडघशी पाडणे होय.

आज मंगळवार.

मला हा ऑनररीचा किस्सा डॉ. व्यासनी रविवारी रात्रीच सुनावला होता. ते त्या दिवशी अहमदाबादेत होते. ऑनररीशी त्याची बोलणी झाली. बड्या घेंडाची जी दयनीय अवस्था झाली त्याचे त्यानी मोठे विनोदी वर्णन केले. उच्च मध्यम वर्गीयांच्या मनाचे ते उत्तम प्रदर्शन होते.

एकेका ऑनररीला मुख्यमंत्री माधवसिंग सोलंकी यानी बोलावून घेतले, त्याला दम दिला व सागितले, 'तुम्ही या डॉक्टरांना पैसे पुरवीत आहात, त्यांना सर्व प्रकारची मदत देत आहात ते बरोबर नाही.'

'पण आम्ही काही मदत करत नाही!'

'मजजवळ सारे सी. आय. डी. रिपोर्टस् येतात सविस्तर मी आपणास बरेच काही सागू शकेन; पण या घटकेला त्याची जरूर नाही असे मला वाटते. आपण जर हा पाठिंबा बऱ्या बोलाने काढून घेतलात तर ठीक आहे. नाही तर–'

'नाही तर काय?'

'मला माझे मार्ग वापरावे लागतील. तुम्हाला ऑनररीशिपला मुकावे लागेल. तुमच्या घरावर इन्कमटॅक्सचे छापे पडतील. तुम्हाला आम्ही नॅशनल सिक्युरीटी ॲक्टखाली पकडूदेखील शकतो!'

तुरुंगात जायला या ऑनररीची तयारी होती. त्याने त्यांची 'इमेज' लोकांत वाढली असती. ते हिरो ठरले असते. तसे करणे त्याच्या पथ्यावर पडले असते.

ऑनररी पोस्ट ही मानाची जागा असते. मी ससूनला किंवा के. ई. एम्‌ला 'ॲटॅच्ड्' आहे याचाच अर्थ मी 'मोठा डॉक्टर' आहे. हे मोठेपण सहजासहजी गमावण्यास कोणीही ऑनररी तयार नसतो. त्यात गरिबाची सेवा फुकट करण्याची आयती संधी मिळत असते. मला एखाद्या गरीब रोग्यास दाखल करून त्यास दवा-पाणी करायची इच्छा आहे; पण तसे करण्यासाठी मला एखादे हॉस्पिटल उपलब्ध पाहिजे ना? स्वतःच्या हॉस्पिटलात एखाद्यास फुकट औषधपाणी करता येईल; पण सातशे-आठशे रुपयांचा त्यात खड्डा यायचा! ते कोणासही परवडण्यासारखे नसते आणि मुख्य म्हणजे

तुम्ही ऑनररी आहात म्हणजे मोठे डॉक्टर आहात. याने तुमची प्रॅक्टिस वाढणार असते. लोकांना वाटते तुम्ही बडे डॉक्टर आहात. गरिबांची रक्त, थुंकी वगैरे तपास तुम्ही हॉस्पिटलातून फुकट करवून घेऊ शकता व त्याच्या मदतीने तुम्ही अचूक निदान करू शकता.

हे लाभ सुखासुखी सोडायला कोणता डॉक्टर तयार होईल? ऑनररीशिप जायची म्हणजे मान जाण्यासारखे आहे.

प्रत्येकाचा त्याला विरोध होता.

तुम्ही ऑनररीशिप सोडली तर तुमचा दुसरा व्यावसायिक बंधू ती जागा घेण्यासाठी टपून बसलेलाच असतो.

लोकांची स्मरणशक्ती फार कमी असते. ते तुम्हाला चटकन् विसरतात व तुमच्या इतर बंधूच्या मागे लागतात.

ते एकवेळ परवडेल, पण प्राप्तीकरवाल्याच्या धाडी?

तुमच्या बँकेतले खाते, लॉकर, तुमचा पत्रव्यवहार, आर्थिक नोंदी, कागदाचा प्रत्येक चिटोरा ते ताब्यात घेणार, त्यास टाळे लागणार, त्याची चौकशी होणार व त्याचा साद्यंत वृत्तांत पेपरात येणार!

सान्यांना ते ऐकून थंडी भरल्यास नवल नव्हते.

हे चित्र एका बाजूला.

आणि दुसऱ्या बाजूला तरुण, नवीन पास झालेले, विशेष प्रॅक्टिस नसलेले डॉक्टर्स. आंदोलन चालू ठेवण्यासाठी त्यांचा उत्साह उतू जात होता. इन्कमटॅक्सवाल्यांची धाड पडली तर पडू द्या, काय बिघडते त्याचे? प्रॅक्टिसच चालत नाही, प्राप्तीचा प्रश्नच येत नाही. पांढरा पैसा मिळण्याची मुष्कील, तर काळ्या पैशाची कुठे बात करता?

त्यांचा एकच आग्रह, आंदोलन चालू ठेवा!

'यू हॅव नथिंग टू लूज!' सिनियर ऑनररी लोक त्यांना चिडून म्हणत.

मिस्किलपणे ही नवी मंडळी म्हणत, तुम्ही जागा खाली करा म्हणजे आम्हाला त्या मिळतील. मग बघू या काळा पैसा की गोरा पैसा कसा मिळतो तो!

चार तास तुंबळ युद्ध चालले.

मुख्यमंत्र्यांना भेटून आलेली दहा-बाराच मंडळी होती. त्यांची खात्री होती, या सभेत देखील मुख्यमंत्र्यांना खबर पोचविणारी मंडळी हजर आहेत. अगदी अजिजीने कळवळून ते लोक सांगत होते, 'आमचे ऐका, पाठिंबा मागे घ्या, आपल्या सर्वांच्या हिताचे आहे!'

'आमच्या काय हिताचे आहे?' नवे लोक विचारीत होते. सिनियर मंडळींची त्रासिक चर्या पाहून ते खूष झाले होते.

शेवटी ही सिनियर मंडळी जिंकली.

नवे लोक चिडले; पण त्यांचे काय चालणार होते? समाजात, सरकारात व डॉक्टरी वर्तुळात त्यांचे कोण ऐकणार होते?

त्यांच्यापैकी काही जण माझे मित्र होते. 'अन्याय आहे हा!' ते म्हणाले.

मी खांदे उडविले व म्हणालो, 'माझ्या लहानपणापासून मी शिक्षणक्षेत्रात अन्यायच पहात आलो आहे, अनुभवला आहे.'

'कसा काय?'

'मी लहान होतो, शाळेत होतो तेव्हा बडोद्यात गायकवाडवाडी होती. त्या वेळी मी मराठा म्हणून जन्मलो असतो तर किती बरे झाले असते असे रोज माझ्या मनात येई. मराठा मुलाला फ्रीशिप, स्कॉलरशिप, हॉस्टेलमध्ये रहाणे-जेवण तेवढे फुकट नसे. एम. ए. पर्यंत मराठा विद्यार्थ्यांना ह्या सवलती मिळत; पण त्या सवलतीचा फायदा फारसा कोणी घेत नसे. मराठा मुले कॉलेजात येत ती खानदेशातून किंवा महाराष्ट्रातून. स्थानिक मुलांना शिक्षणाची किंमत नव्हती.'

'आणि मेडिकल कॉलेजात?'

'पटेल लोकांचे वर्चस्व होते. रुपयात बारा आणे पटेल प्राध्यापक असत. त्यामुळे पटेल म्हणून जन्मलो असतो तर आपले भले झाले असते असे वाटे. माझ्या आठवणीत तिघा मुलांनी आपली नावे पटेल म्हणून बदलली. माझ्या वर्गात तीसच मुले होती, म्हणजे विचार करा!'

माझे मित्र डोकी खाजवितात.

'ब्राह्मण-वाणिया डॉक्टर्सची संख्या बडोद्यात गेल्या दशकात वाढली. त्याआधी 'शिवाजी सेज्' सारखा 'पटेल सेज्' हा गेम चालू होता. कसली अन्यायाची घोषणा घेऊन बसला आहात? आता हरिजनांची चलती आहे. आपण हरिजन म्हणून जन्मलो असतो तर बरे झाले असते असे वाटते, आज. उद्याचे काय सांगावे?'

## अकरा मार्च

"मान लिया, दादूमिया, मान लिया—" सकाळीच माझ्या एका दोस्ताचा फोन.

गृहमंत्री रावळ यांनी संघावर आम्ही बंदी आणू अशी धमकी दिली आहे, हे मी त्यास पूर्वीच सांगितले होते. त्यामुळे त्याने सकाळी उजाडतच मला फोन केला होता.

माझ्या घरी कर्सनदास येऊन बसला होता. अहमदाबादेस डोनेशनच्या सीट्स् आहेत तीन. त्या काढून टाकाव्यात अशा प्रकारच्या पत्रावर त्याला माझी सही पाहिजे होती. ह्या सीटवर प्रवेश मिळविणाऱ्या डॉक्टरांना मार्कस् कमी असतील तर चालते. हरिजन डॉक्टर्सचा समाजाला धोका तर या डोनेशन सीटवाल्या डॉक्टराचा समाजाला धोका नाही का, अशा अर्थाचे ते पत्र होते

मी डोके खाजवीत होतो, सही करावी की करू नये. कारण हे सारे डोनेशन सीटवाले डॉक्टर्स परदेशी जाऊन तेथील प्रगत तंत्र शिकून आले होते. फार श्रीमंत होते ते!

¤

चोरघडे आज नागपूरला परत जाणार होते. त्यांना रेल्वेस्टेशनावर पोचवायला म्हणून गेलो होतो.

प्लॅटफॉर्मवर चोरघड्यांनी वेटिंग रूमवर असलेल्या पाटीकडे बोट दाखविले. त्यावर लिहिले होते, "उच्चवर्गीय आरक्षण!"

ते म्हणाले, "येथेही हाच प्रकार आहे. आंदोलन होईल बरं का या पाटीवरून!"

"बी. सीना सांगू नका, नाही तर ते जाळूनच टाकतील ही पाटी!" मला त्या 'अपर क्लास रिझर्व्हेशन'च्या पाटीचे मनापासून हसू आले.

## बारा मार्च

परवा अहमदाबादेहून संघाच्या लोकांनी गृहमंत्र्याच्या खोडसाळ विधानांना हरकत घेतली आणि काल नागपूरहून बाळासाहेब देवरस यांनी रावळ कसे व किती खोटे बोलतात, सरकारला कोणतीही समस्या सोडविता येत नसली की सरकार संघाला बकरा कसे बनविते व त्याच्या माथी सारा दोष टाकून मोकळे होते ते जाहीर केले. बकरा कापायचा असेल तर तो निरोगी व सशक्त पाहिजे. संघ ह्या जातीत बहुधा मोडतो व म्हणूनच सरकार वारंवार संघावर असे हल्ले करत, असेही बाळासाहेब देवरस म्हणाले.

¤

# 1980 त केली पायाभरणी 1981 त करूं या उभारणी

1980 त भरमसाठ वाढत्या चलनवाढीला पायबंद घालण्यात आला आणि त्याबरोबरच, कोळसा, वीज, औद्योगिक वस्तु आणि अन्नधान्य यांच्या उत्पादनात भरीव वाढ करण्यात आली.

**समाजातील कोणताहि गट, राष्ट्रीय उत्पन्नात मोठ्या वाटयाची मागणी करण्यापूर्वीच, मिळविलेल्या यशाला भक्कम करून, उत्पादन वाढवणें हीच आजची गरज आहे.**



**आमचे परवलीचे शब्द**

**कठोर परिश्रम आणि आत्मनिग्रह**

davp 80/461

आंदोलन अजून चालूच आहे.

मेहेसाणा जिल्ह्यातील पाटण येथे गोळीबारात एक मयत व दोन घायाळ झाले आहेत. विद्यार्थ्यांच्या मोर्चाचे नेतृत्व भारतीय जनता पक्षाच्या डाह्याभाई पटेलांनी केले होते. त्याना पोलिसानी पकडले व नतर जामिनावर सोडूनही दिले.

अहमदाबादेत रात्रीचा कर्फ्यू चालूच आहे. दर्यापूर व नवरंगपुरा विभागात मात्र कर्फ्यू नाही. बडोद्यात विश्वामित्राच्या पुलापलीकडे कोठे कर्फ्यू आहे? माजी मेयर सुधीर जोशीच्या भगिनी आज दवाखान्यात आल्या होत्या. त्याच्याबरोबर सौ. पटेल होत्या. "आमच्याकडे इतके शांत वातावरण असते की बडोद्यात धमाल आहे हेही कळ तच नाही." सौ. पटेल मला सांगत होत्या, "दगडफेक म्हणजे काय हे पहाण्यासाठी आम्ही मध्यंतरी पूल ओलांडून गावात गेलो व प्रत्यक्ष दगडफेक कशी असते त्याचा अनुभव घेऊन आलो."

एन. एस. ए. खाली विद्यार्थ्यांची धरपकड चालूच आहे. २४ फेब्रुवारी रोजी पकडलेल्या गिरीश गांधीला काल हायकोर्टाने सोडून दिले. आंदोलनाचा सूत्रधार भास्कर भट भूमिगत झाला आहे. पोलीस त्याच्या मागावर आहेत. काल त्याला त्याच्या चौदा मित्राबरोबर अहमदाबादेत पकडले, असे मला सुरेशभाईने अहमदाबादेहून टेलिफोनवरून सांगितले; पण सुरेशभाई म्हणाला, "कदाचित् पोलिसाची ही बातमी खोटीसुद्धा असू शकेल!"

हे सारे नवनिर्माणाप्रमाणे वाटून राहिले आहे किंवा आणीबाणीतील वातावरणाप्रमाणे! अर्थात् तेवढे टेन्शन वाटत नाही. अजूनही इंदिरेची भीति सर्वांना वाटते. अजून? ¤

हल्ली राखीव जागावर मतप्रदर्शन करण्याची जणू स्पर्धाच चाल आहे.

म. टा. मध्ये 'राखीव कुरण' संपादकीयावर पत्रापत्री झाली. टाइम्स व एक्स्प्रेसमध्ये हल्ली त्याच विषयावर पत्रे येत आहेत

नागपूरहून हरी विष्णु कामतांनी राखीवतेचा विचार करण्यासाठी सरकारने एक कमिशन नेमायची सूचना केली आहे. डॉ. आंबेडकराना ह्या राखीव जागा मान्य नव्हत्या व लौकरात लौकर त्या नष्ट कराव्यात, असे त्याचे मत होते. या कमिशनने आर्थिकदृष्टया मागासलेले म्हणजे कोण, तेही नक्की करावे, या राखीव जागांमुळे सामाजिक न्याय व समतेऐवजी उलटाच प्रकार होत आहे व लोकात एकात्मता वाढण्याऐवजी द्वेष वाढीस लागत आहे, असे आपले मत श्री. कामत यांनी निर्भीडपणे व्यक्त केले आहे. ही राखीव कुरणे किती दिवस चालू ठेवायची हे आता आपण एकदाच व शेवटचे नक्की करू या. जातीसाठी राखीवतेची सवलत प्रवेशापुरती ठीक झाली, त्यापुढे ही सवलत असता कामा नये, घटनेत तशी तरतूद नाही. जर सरकारजवळ संघाविरुद्धचे पुरावे असतील तर ते सरकारने प्रसिद्ध करावेत व संघाविरुद्ध कारवाई करावी वगैरे जोरदार सविस्तर मुलाखत कामतसाहेबांनी दिली आहे. गुजराथच्या आदोलनास त्याचा पाठिंबा आहे.

मुख्य म्हणजे उघड पाठिंबा आहे. इतराचाही आहे, पण पडद्याआडून. ह. वि. कामताचे काम खुल्लंखुल्ले.

¤

काल सविताबाई आंबेडकरानी अहमदाबादेस भेट दिली. बाबासाहेबांच्या या पत्नी· मुख्यमंत्र्याना त्या भेटल्या. आपण अकरा हजार रुपये हरिजन निर्वासिताना आधीच वाटले आहेत, असे माधवसिंग सोलंकीनी सविताबाईंना सांगितले. हे आंदोलन पसरत आहे, त्यामुळे राज्यातील हरिजन हवालदील झाले आहेत. कदाचित असेच आंदोलन इतर राज्यांत पसरेल, अशी भीती सविताबाईंनी व्यक्त केली.

बापूराव पाखिते हे दलित पँथरचे पुढारी बाईंबरोबर आहेत मेहसाणा जिल्ह्यातील डेथ्रोज गावात हरिजनाच्या पस्तीस झोपडया सवर्णांनी जाळून टाकल्या व सातशे हरिजन निर्वासित झाले असे म्हणतात. ही मंडळी या गावी गेली होती.

प्रचाराच्या धामधूमीत खरे काय ते तेथे प्रत्यक्ष गेल्याशिवाय कळणार नाही. फॅमिली प्लॅनिंगवर बरोडा मेडिकल युनियन हॉलमध्ये परिसंवाद आहे. आपणही त्यात बोलणार आहोत. तरीही एखादा दिवस डेथ्रोजला जाऊन यावे असेम नातून वाटत आहे. रविवार आदर्श दिवस; पण रविवारी परिसंवाद. म्हणजे अर्धा दिवस बडोद्यातल्या बडोद्यातच जाणार!

इंटरचेजेबिलिटी व कॅरी फॉरवर्ड पद्धत जाडेजा यांनी एका झटक्यात काढून टाकली; पण दलित पँथर्सच्या पुढाऱ्याच्या ते नीट लक्षात आलेले दिसते. हा निर्णय घ्यायच्याआधी तुम्ही दलित पुढाऱ्यांशी चर्चा करावयास हवी होती, असे ते म्हणतात. सरकारने सारा जोर व शक्ती वापरून हे आदोलन दडपून टाकावे अशी त्यानी विनंती केली. हे आदोलन राखीवताविरोधी नसून हरिजनविरोधी आहे, असे मत त्यानी व्यक्त केले आहे.

आणि याउलट गुजराथ युनिव्हर्सिटीची मंडळी सांगत आहेत, 'काही चिंता करू नका, मुलांच्या परीक्षा बरोबर होतील, कोणाचे नुकसान होणार नाही—सारे आलबेल आहे.'

¤

राजस्थानात हे आंदोलन सुरू झाले आहे. सिरोही, जलोर व पाली हे जिल्हे गुजराथला अगदी लागून आहेत तेथे दगडफेक, हिंसा, मोर्चे सुरू झाले आहेत. गुजराथचे दोन ट्रक्स भरून विद्यार्थी माउट अबूला गेले होते. त्यानी पालीच्या विद्यार्थ्यांना आम्हाला सहकार्य द्या, अशी विनती केली म्हणून पाली येथे मोर्चे निघाले.

अबूरोड व संदेराव गावातही हिंसेचे प्रकार घडले. पाली, जलोर व सिरोही या जिल्ह्यात बसेसवर दगडफेक करून त्या थाबविण्याचे प्रकार घडले. बेकार कॉलेजतरुणाचा यात भाग होता. अखिल भारतीय शोषित कर्मचारी या रेल्वेकर्मचाऱ्यांचाही या आदोलनात भाग आहे.

उदेपूर येथे सारी दुकाने बंद ठेवण्यात आली होती. शाळाकॉलेजेही बदच आहेत जोधपूरला विशेष काही घडले नाही. कोटा, बरन, जलोर व सिरोही येथे विद्यार्थ्यांनी बरीच दंगल सुरू केलेली आहे.

ही नवनिर्माण आंदोलनाची छोटी आवृत्ती तर नाही ना?

## तेरा मार्च

आज शुक्रवार. म्हणजे रोटरीची मीटिंग; पण या आदोलनाच्या गडबडीत मीटिंग होणार का नाही?

गुजराथ रीफायनरीच्या कर्मचाऱ्यांनी नेमके काय चालविले आहे ते कळत नाही. टेलिफोनवर फारसे विचारता येत नाही. फोन्स टॅब होतात. उगाच समोरच्याला तकलीफ.

रीफायनरीत सहाशे होमगार्डस् का बरे आयात केले गेले असावेत?

तेथील कर्मचाऱ्याचा गेले तेरा दिवस गो स्लो संप चालू आहे. आठ कर्मचाऱ्यांना काढून टाकल्याचे कानावर आले आहे.

तीनशे होमगार्डस् ऑपरेशन ड्यूटीवर व तीनशे होमगार्डस् लोडिंग ड्यूटीवर राहणार आहेत.

सी. आर. पी.ची एक आख्खी कंपनी रीफायनरीत कशासाठी आली असेल बरे? आसामटाइप आदोलन गुजराथमध्ये सुरू होईल अशी भीती सरकारला वाटत असावी. कोणी घातपात केला, कोणी स्फोट घडवून आणला तर—

तर काय?

बडोदेच उडून जाईल!

नकाशातून ' राइट ऑफ ' होईल !

¤

जामनगरमध्ये फिशरीजच्या जीप्सना आग लावली.

*पाटण येथे दगडफेकीत एक पोलीस घायाळ झाला.*

अहमदाबादेत धमाल चालूच आहे.

फालना या राजस्थानी शहरात दंगे जोरात चालू झाले आहेत. पोलिसांनी अश्रुवायू सोडला.

राजस्थानच्या वैद्यकीय विद्यार्थ्यांनी गुजराथच्या आंदोलनास आपला पाठिंबा जाहीर केला आहे.

आंदोलन पसरत चालले आहे.

## चौदा मार्च

अहमदाबादेत काल पोलिसांनी सोळा राउंडस् गोळीबार केला.

गोळीबारात किती मरण पावले त्याचा आकडा सरकार प्रसिद्ध करते. किती घायाळ त्याचेही आकडे प्रसिद्ध होतात; पण या घायाळांपैकी पुढे किती मरतात वा जगतात, याविषयी सरकार चूप बसते. प्रत्यक्षात मृतांचा आकडा जास्त असावा. सरकारने प्रसिद्ध केलेल्या आकड्यावर एक शून्य जास्त ठेवा, असे मला कोणीसे सांगितले.

काल आनंदहून किसनभाई पडियार आले. त्यांचा तेथे मोटारी बनविण्याचा कारखाना आहे. साठ साठ अश्वशक्तीच्या मोटारी त्यांच्या कारखान्यात बनतात.

' मोर्चा, लाठीहल्ला, पथ्थरबाजी, गोळीबार व पेपर्समधून पोलिसांविरुद्ध अपप्रचार–ही आता स्टॅंडर्ड गोष्ट झाली आहे.' पडियार म्हणाले,

' मला पोलिसांची दया येते. '

' तेही तशाच लायकीचे आहेत. आमच्या आनंद शहरात पोलिसांना भूक लागली, म्हणून त्यांनी भुस्सु–भजियाचे दुकान फोडले व सारा माल खाऊन फस्त केला. '

' *पण त्याचे या पेट्रोलिंगमध्ये हाल होतात !* '

' ते मी कबूल करतो. तीन-तीन दिवस रस्त्यात बसावे लागते वा रखडावे लागते. फुटाणेदेखील पुरते मिळत नाहीत. त्यामुळे वड्याचे तेल वांग्यावर काढतात. जो दिसेल त्याला भुईसपाट करतात. घरी घुसून दंडे मारतात. ते मी समजू शकतो; पण दुकाने पोलिसांनी लुटणे–यास तुम्ही काय म्हणणार ? हा शुद्ध जुलम आहे. हा प्रकार थांबविला पाहिजे. '

' पेपर्समध्ये पोलिसाविरुद्ध खूप मजकूर येतो. त्याने ते चिडून जात असतील. '

' शक्य आहे, पण गोष्टी या थराला जाऊ नयेत. '

' आज मोरारजीभाई जागे झालेत, ' एक मित्र मला म्हणाला, ' आज मार्च चौदा. म्हणजे दीड महिन्यानंतर मोरारजीभाईंना जाग आली. '

' पण जाग तर आली ? '

' या व्होटबॅंकमुळे सर्वांनाच जाग आज ना उद्या आलीच पाहिजे. पण मोरारजीची कंपनी पाहिलीत का ? '

' म्हणजे ? '

' विद्यार्थ्यांनी शांतपणाने सरकार बरोबर चर्चा करावी, आंदोलन मागे घ्यावे व निकाल आणावा असे जे मुंबईहून पत्रक प्रसिद्ध झाले आहे त्यावर मोरारजीबरोबर नानी पालखीवाला, सी. सी. शहा, डॉ. अल् दस्तूर व डॉ. शांतिलाल मेहता यांच्या सह्या आहेत. '

' सारे भांडवलशहांचे हस्तक. '

' हं. '

उद्या आमचे फॅमिली प्लॅनिंगवरील सिंपोझिअम. मिलिंदने रात्रभर जागून छान स्लाइडस् बनविल्या आहेत. उद्याचे आपले भाषण गाजणार. कोठून तरी लाल व ब्ल्यू डाईज मिळविले पाहिजेत. *त्या लाल-निळ्या स्लाइडस् अतिशय सुंदर दिसतात.*

काल लोकसभेत तासाच्यावर चर्चा व गोंधळ झाला. राजस्थान व गुजराथमधील आंदोलनावरून जनता ( एस ), लोकदल, डी. एस. एफ. वगैरे खासदारानी स्पीकरला खूपच सतावून सोडले. स्पीकरचे म्हणणे, या आंदोलनावर चर्चा आधीच झाली आहे. हे खासदार हट्ट धरून बसले, या आंदोलनावर पुन्हा चर्चा झालीच पाहिजे. आपल्या दिल्लीच्या खासदार दोस्ताचा फोन आला तर फार बरे होईल. येथून ५०–६० रुपये खर्च करून त्याला फोन करणे फार महागात पडेल यासाठी आपली एखादी संस्था, फर्म वा इंडस्ट्री असावी. कंपनीच्या खात्यावर खर्च टाकला की सुटलो.

अहमदाबादेत राजणारायणाच्या गाडीवर काल कोणी तरी दगडफेक केली. टिपिकल राजनारायणी स्टाईलमध्ये त्यांनी पत्रकारांना सांगितले, ' हा नॉनहरिजन दिसतोय. '

आंदोलनवाल्यांनी त्याच्या गाडीचे एरियल तोडले, गाडीची कांच फोडली पण राजनारायण ' बची गया ! ' फक्त हरिजनांची घरे व हालत बघता आहात, जरा सवर्णांचे हाल पहायला चला ना, अशी विनंती काही विद्यार्थ्यांनी राजनारायणांना केली. ते घाबरले. त्यांनी सांगितले, तुम्हाला माझ्याशी चर्चा करायची आहे ना ? मग तुम्ही सर्किट हाउसवर या. ही मुले हटून बसली. ' अं हं, इथेच. ' राजनारायण ' नाही ' म्हणाले. ' मुले भडकली व त्यांनी दगडफेक केली.

## पंधरा मार्च

आज फॅमिलीप्लॅनिंगवरील परिसंवाद छान रंगला. अध्यक्षस्थानी म्यु. कमिशनर पार्थसारथी होते. डिसूझा Quality vs quantity वर बोलले. डॉ. रतुभाई पारीख *' नसबंदी पुनश्च सक्तीची करा'* या विषयावर बोलले. माझे भाषण उत्कृष्ट झाले. याचे कारण रंगीत स्लाईडस. डॉ. व्यासनी मला विषय दिला होता : A la carte Menu and uptodate Kitchen. सुंदर डिशेस पाहून आमची भूक मात्र तू चांगली प्रज्वलंत केलीस, असे सर्व म्हणाले. खरं म्हणजे माझी खोडी काढण्यासाठी डॉ. व्यासनी मला हा कोड्यातला विषय दिला होता. कुटुंबनियोजन व स्वैंपाकघर यांची मी तुलना करून विषय असा रंगविला की पूछो मत.

म्यु. कमिशनरांबरोबर चहापान झाले. म्हणून मी वैजयंतीस पुढे घरी जाण्यास सांगितले.

चहापानानंतर घरी परत जाण्यासाठी डॉ. पटेलच्या गाडीत बसलो. डॉ. व्यासही मध्यभागी होते. डॉ. पटेलांनी दरवाजा जोरात खेचला. त्यांना माहीत नव्हते, माझा उजवा अंगठा दारात आहे.

'आई ग–' माझ्या तोंडातून एक चीत्कार बाहेर पडला.

लगेच गाडीतून बाहेर पडलो,युनियन हॉलच्या ऑफिसमधील रेफ्रिजरेटरमधून बर्फ काढला व उजवा अंगठा बर्फात ठेवला.

जुजबी बॅंडेज बांधून मी घरी आलो. जेवलो. अंगठा दुखतच होता. म्हणून एक ॲनाल्जिन व कापोज घेऊन झोपी गेलो.

संध्याकाळी डॉ व्यास आले. माझा अंगठा कसा काय आहे ते बघायला. मला खूप बरे वाटले. व्यास वॉज माय पेनकिलर

डॉ. पटेलचा रात्रीपर्यंत तब्येत कशी आहे त्याविषयी साधा फोनसुद्धा नाही ! आमच्या रोटरी क्लबाचा मेंबर आहे. कसली फेलोशिप

आली डोबलाची ? साधी मानवता देखील नाही.

'जे का रंजले गांजले

त्यासी तू आपुला

म्हणविशी–'

हा आपल्याला चांगला धडा आहे.

दुःखी माणसाचे अश्रू पुसले तर किती बरे वाटते त्या दुःखी माणसाला

'वैष्णव जन तो तेने कहिये

जो परपीडाई जाने रे–'

आणि आम्ही उच्चवर्णीय ?

या मागासलेल्या लोकाच्या भावना जराही जाणीत नाही. त्यांचे अश्रू पुसण्याची गोष्टच नको.

आणि हे राखीव जागाचे आदोलन ?

त्याने तर सारे वातावरण दूषित झाले आहे. नाही म्हटले तरी वर्णयुद्ध सुरू झाले आहे. वर्गयुद्ध तर चालू आहेच.

काय गमत आहे !

माझा दुखरा अंगठा मला दुःखिताचे तत्त्वज्ञान आपोआप शिकवीत आहे.

'घायलकी गत

घायल जाने

दुसरा न कोई–'

मीराबाईचे हे शब्द अगदी बरोबर आहेत.

हरिजनाचे दुःख सवर्णांना कळणे शक्यच नाही.

¤

हे काय चालले आहे ?

तबीबी आदोलन हरिजनाविरुद्ध नाही, ते आहे पदव्युत्तर पातळीवरील अनामत जागाविरुद्ध. या राजकारणी लोकानी मुद्दामच गैरसमजुती पसरवून ही आंदोलनाची आगगाडी निराळयाच रुळांवर चढविली आहे.

मेहेसाण्यातील विजापूर तालुक्यातील देत्रोज गावात घडलेला कालचा प्रसंग मोठा लाजिरवाणा आहे. सवर्णांनी अवर्णीयांची 'वस्ती' जाळून टाकावी ? त्या वस्तीत आज कोणी नाही. पोलादी हेल्मेटधारी पोलीस फक्त वावरताना दिसतात. फेब्रुवारी २७ च्या रात्री ही जाळपोळ घडली. नगारे वाजविण्यात आले, लाठ्या व केरोसिनचे डबे घेऊन सवर्ण लोक देत्रोजच्या वस्तीत (महारवाडा) शिरले, केरोसिन शिंपडून झोपडचाना आगी लावल्या गेल्या, जमाव दारे फोडून घराघरात शिरला, वस्तूची लुटालूट करण्यात आली, आक्रोश करीत हरिजन स्त्रिया घराबाहेर पडल्या; पण त्याचा आक्रोश ऐकण्याच्या मनःस्थितीत जमाव नव्हता.

तेथील खरी परिस्थिती जाणून घेण्यासाठी मी कर्सनभाईबरोबर त्याच्या कंपनीच्या मालकीच्या जीपमधून पहाटे पहाटेच निघालो. सकाळी दहाच्या सुमारास देत्रोज आले.

देत्रोजची वस्ती आठ हजार. साऱ्या घराची राखरागोळी झाल्यावर सर्व हरिजन या गावातून पळून गेले.

शेजारी कुकाव गाव आहे. दलपतसिंग गुमानसिंग तेथील सरपंच आहे. त्याने या हरिजनाना आपल्या गावी आसरा दिला. देत्रोजचा कर्सनभाई नाथभाई हा एक वृद्ध हरिजननेता म्हणतो, 'दलपतसिंग सवर्णच आहे. कुकावमध्ये आम्हाला सवर्णीयांनीच आश्रय दिला व संरक्षण दिले आहे. मला काहीच कळेनासे झाले आहे.'

देत्रोजमध्ये या कर्सनभाईचे पक्के घर आहे. त्या रात्री सुमारे पन्नास हरिजन पळून आले व या घरात रात्रभर राहिले. त्याच्याही घराला आग लावण्यात आली. सारे हरिजन जळून मेले असते. एवढ्यात पोलिसाच्या जीप्स आल्या व हे अवर्ण सवर्णांच्या क्रोधाग्नीपासून वाचले.

देत्रोज व कुकाव गावाना जत्रेचे स्वरूप आले आहे. सारे राजकीय छोटे-मोठे पुढारी हरिजनाचे अश्रू पुसण्याच्या निमित्ताने तेथे जमलेले दिसतात. त्याच्याबरोबर त्याचे वार्ताहर व फोटोग्राफर्सही आहेत.

या गरीब हरिजनाना हे काय होऊन राहिले आहे ते कळत नाही. जो तो पक्षाचा पुढारी त्याना मोठमोठी आश्वासने देतो. सरकार प्रत्येकाला दीड रुपया मदत म्हणून देते. जो तो पुढारी तुम्हाला दर डोई दहा रुपये मिळाले पाहिजेत, खायला-प्यायला सरकारने फुकट दिले पाहिजे, घरे पुन्हा बाधून दिली पाहिजेत वगैरे लंब्याचवडचा बाता या गरीब हरिजनांना मारतो ! प्रत्येक पक्ष सरकारने ही मदत तुम्हाला दिली पाहिजे, असे म्हणतो. कोणत्याच पक्षाने आम्ही तुम्हाला मदत करू असे जाहीर केलेले नाही.

ही आश्वासने ऐकून गरिबाना क्षणभर बरे वाटते; पण ही मदत प्रत्यक्षात आपल्या हाती कधीच लागणार नाही याचीही या हरिजनांना खात्री आहे.

'खरोखर मदत मिळणार असेल तर आम्ही स्वतःच आमच्या वस्त्याना आगी लावायला तयार आहोत, आमच्याजवळ होते काय ?' एक हरिजन हसत मला म्हणतो.

'सध्या तुमचे कसे चालते ?'

'या कुकाव गावचे लोक चागले आहेत ते आम्हाला खाऊ-पिऊ घालतात; पण असे किती दिवस चालणार ?'

'देत्रोजला तुम्ही परत केव्हा जाणार ?'

'सध्या तरी नाही. आम्हाला परत जायची भीती वाटते. तेथे सुरक्षितता वाटत नाही. अहमदाबादेच्या डॉक्टरी आंदोलनामुळे हे घडले. देत्रोजचा कोणीही विद्यार्थी डॉक्टरी शिकत नाही. आम्ही गावातल्या गावात मजुरी करतो. रोज चार-पाच रुपये मिळतात. आमचा त्या डॉक्टरी आदोलनाशी काही सबंध नाही. आम्हाला उगाच का ही शिक्षा ?'

मला शरमल्यासारखे होते.

उगाचच मन भूतकाळात जाते व महाराष्ट्रात गांधीवधानंतर ब्राह्मणाच्या घराची जाळपोळ केली गेली त्याची आठवण होते. वाई गाव तर यशवंतरावाच्या गुरुजीचे. तेथील वयोवृद्ध अभ्यंकर वकिलांना चौकाचौकात बुकलण्यात आले, ते त्यातच गेले.

त्यांचे शब्द अजूनही माझ्या कानात घुमतात, 'गाधीवधाशी माझा काहीही संबंध नाही. का मला उगाच शिक्षा या म्हातारपणी ?'

माझ्या मनात आले, त्या आग लावणाऱ्या व निर्दोष, गरीब ब्राह्मणाना जाळून टाकणाऱ्या गुडाना शिक्षा कोणती झाली ?

काहीच नाही.

गुजरायमध्ये त्याच इतिहासाची पुनरावृत्ती कशावरून होणार नाही ?

**समाप्त**

**MANOOS** (Marathi Weekly) **100 Paise** Regd. No. PNC–W 28
(Licensed to post without prepayment of postage–No. 11)


# आजपासून १० वर्षांनी..



शाळेतलं शिंक्षण उत्कृष्ट रीतीनं पुरं झाल्यावर त्यांच्यासाठी जे भावी क्षेत्र निवडलं जाईल त्यानुसार या मुलांच्या महाविद्यालयीन किंवा तांत्रिक शिक्षणाची सोय करावी लागेल.
तुम्ही वेळच्यावेळी बँक ऑफ महाराष्ट्राच्या आवर्त ठेव योजनेत पैसे गुंतवलेत तर तुमच्या मुलांच्या भावी शिक्षणाच्या खर्चाबावत तुम्हाला काळजी राहणार नाही.

ही आवर्त ठेव योजना सोपी, तशीच सोयीस्कर आहे. किमान ५ रुपये किंवा त्याच्या पटीत १२ ते १२० महिन्यापर्यंत गुंतवा आणि एकत्रित भरपूर व्याजासह रक्कम परत घ्या.

थोडक्यात आवर्त ठेव योजनेत गुंतवणूक म्हणजे तुमच्या मुलाच्या शिक्षणाची आर्थिक जवाबदारी तुम्ही अप्रत्यक्षपणे बँक ऑफ महाराष्ट्राकडे सोपवित आहात.

बँक ऑफ महाराष्ट्र
(भारत सरकारचा उपक्रम)
'लोकमंगल', शिवाजीनगर, पुणे ४११ ००५

बँकिंग सेवा व्यक्तिगत जिव्हाळा

RAAS/BM/1003